

# बिसेन डेन्टल केअर

**डॉ.दिप(पंकज) बिसेन** **डॉ.खुशबू बिसेन(पटले)**

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ४४ | बुधवार,दि.०५ ऑक्टोंबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# हत्तींच्या हल्ल्यामध्ये एका शेतकऱ्याचा मृत्यू ,एक जखमी

## मृत्यू झालेल्या शेतकऱ्यास तातडीने शासकीय अनुदान द्या-पालकमंत्री





**गोंदिया:** गोंदिया वनविभागाअंतर्गत नवेगांवबांध वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र जब्बारटोला मधील कक्ष क्रमांक १९७ चे राखीव वनात झाशी-नगर उपसा सिंचनच्या कालव्या शेजारी ०४ ऑक्टोबरच्या सकाळी ७ वाजेच्या सुमारास वन्यप्राणी हत्तीच्या हल्लयात तिडका येथील जोहरु पोरेटी हा किरकोळ जखमी झाला तर सुरेंद्र जेटू कढईबाघ, (वय ५२) यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

या घटनेमुळे परिसरात दहशत पसरली असून घटनेची माहिती मिळताच मृत्यू पावलेल्या व जखमी झालेल्या शेतकऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे २० लक्ष रुपयाचे तातडीने अनुदान देण्याचे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

तिडका गावातील अंदाजे २० ते २५ लोकांचा जमाव हत्तीच्या कळपाने शेतीचे नुकसान करु नये या करीता ०३ ऑक्टोबर २०२२ पासून हत्तींच्या कळपाचा पाठलाग, आरडा-ओरडा, डफरी, फटाके वाजवून करीत होते. त्यामुळे चिडलेल्या हत्तींनी इसमावर हल्ला करुन त्यास ठार मारल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले आहे. या घटनेची त्वरित दखल घेऊन शेतकऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे तातडीने अनुदान वितरित करण्याचे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वन विभागाला दिले. यासोबतच गोंदिया जिल्ह्यातील हत्तीचे कळप परत पाठविण्याची उपाययोजना करावी असे निर्देशही पालकमंत्र्यांनी वनविभागाला दिले.

हत्तींचा कळप नवेगांव राष्ट्रीय उद्यानाचे दिशेने मार्गक्रमण करीत असतांना, नवेगांव राष्ट्रीय उद्यानाच्या सिमेवरील चूटीया गा-वातील ग्रामस्थांनी हत्तींना दुसऱ्या दिशेने पळवून लावले.परिणामी हत्तींचा कळप पुनःश्च तिडका गावाच्या दिशेने वळला. बिथर-लेला हत्तींचा कळप जब्बारखेडा बिटाच्या कक्ष क्रमांक १९७ राखीव वनात फिरत होता. सदर क्षेत्र तिडका गावालगत असून हत्तींच्या कळपाने शेतात येवू नये याकरीता तिडका गावातील २० ते २५ लोकांचा गट हत्तींना जंगलामध्ये पळवून लावण्याकरीता त्यांनी जंगलामध्ये हत्तींच्या मागे अंदाजे तिन किलोमिटर अंतरापर्यंत पाठलाग करुन हत्तींच्या कळपाला हाकलून लावले.

या दरम्यान झाशीनगर उपसा सिंचनाचे कॅनल जवळ कक्ष क्रमांक १९१ (राखीव वन) जब्बारखेडा बिटामध्ये सदर घटना घडलेली आहे. स्थानिक वन कर्मचारी यांचेकडुन ग्रामस्थांना वेळो-वेळी सुचना देण्यात आल्या होत्या. २४ सप्टेंबर, २०२२ रोजी गोंदिया वन विभागाचे हद्दीमध्ये हत्तींच्या कळपाने प्रवेश केल्यापासून सर्व गावांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीकोणातून वन विभागाकडुन जनजागृती केली जात आहे.

वनविभागाचे ६० ते ७० कर्मचारी दिवस-रात्र हत्तींचे सनियंत्रण करीत आहेत. तसेच झालेल्या पिक नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई तात्काळ मिळवून देण्याचे प्रयत्न सुध्दा केले जात आहेत.हत्तींच्या मार्गामध्ये अडथळा केल्यास तो जास्त विध्वंसक होतो, त्यामध्ये नुकसान टाळण्याकरीता खबरदारी घ्यावी, असे आवाहन उपवनसंरक्षक कुलराज सिंह यांनी केले आहे.

# "मविआ"काळात धान खरेदी घोटाळा-देवेंद्र फडणवीस

**भंडारा :-** मविआ काळात धानखरेदीत मोठा भ्रष्टाचार झाला. शासनाने खरेदी केलेले धान्य सापडलेच नाही. हे धान्य केवळ कागदावरच आहे. त्यामुळे ते शोधावे लागेल व ज्यांनी धान्य गायब केले, त्यांना धरावे लागेल, असा इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

भंडारा दौऱ्यावर असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत बोलताना ते म्हणाले की, भंडाऱ्यात धानउत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात आहेत. या शेतकऱ्यांना बोनस मिळालाच पाहिजे. मात्र, मागील सरकारच्या काळात धानखरेदीत भ्रष्टाचार झाला. हा अनागोंदी कारभार दूर झालाच पाहिजे. शेतकऱ्यांचे धान खरेदी झालेच पाहिजे. शेतकऱ्यांच्या नावाने व्यापाऱ्यांचेच धान खरेदी केले जाते, असे आता होऊ नये.



फडणवीस म्हणाले, मागील सरकारच्या काळात जे धान खरेदी झाल्याचे दाखवले गेले, ते धान आम्हाला सापडलेच नाही. ते कागदावरच आहे. हे धान कोणी गायब केले, त्यांना शोधावे लागेल. शेतकऱ्यांशी बेईमानी सहन करणार नाही. मागील सरकारच्या काळात अनेक बोगस संस्था, ज्यांच्याकडे धान साठवणीची जागाही नाही, त्यांनी धान खरेदी केल्याचे दाखवले गेले. शेतकऱ्यांच्या नावाने दुसऱ्यानेच फायदे लाटले. हे आता रोखावे लागेल.

फडणवीस म्हणाले, लवकरच धान खरेदीसाठी बाजारात येणार आहे. त्यांच्या खरेदीची व्यवस्था करावी ला-गेल. शेतकऱ्यांना बोनस तसेच चांगली मदत मिळालीच पाहिजे. तसेच, धानखरेदीही पारदर्शक होईल, यासाठी प्रयत्न करू तसेच, भंडारा हा पर्यटनाचा जिल्हा आहे व सिंचन खाते आता माझ्याकडे आहे. त्यामुळे गोसेखूर्द प्रकल्पाच्या माध्यमातून भंडारा जिल्ह्याचे सिंचन व पर्यटन वाढावे, यासाठी प्रयत्न करू.

फडणवीस म्हणाले, भंडारा जिल्ह्याच्या ज्या काही योजना प्रलंबित असतील त्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू भंडाऱ्यात मेडीकल कॉजेच उभारण्याचा सकारात्मक निर्णय सरकारने घेतला आहे. लवकरच त्याची कार्यवाही केली जाईल. राज्यात जेव्हा भाजपला इतरत्र यश मिळत नव्हते, तेव्ही भंडारा जिल्ह्याने भाजपला भरभरुन दिले आहे. त्यामुळे पुन्हा हा जिल्हा आपल्या हाती घेण्यासाठी चांगले काम करु. जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सर्व प्रयत्न करू.

## दसऱ्याला रावण दहन प्रथा बंद करा

**जिवती-** महात्मा राजा रावण अत्यंत समृद्ध संस्कृतीचा वैभवशाली वारसांचा देदीप्यमान अस्मरणीय ठेवा आहे. राजा रावण विविध गुणांचा समुच्चय आहे महान दर्शनी, संगीत आयुर्वेदाचार्य, उत्कृष्ट रचनाकारतज्ज्ञ, राजनितीतज्ञ, शिल्पकार, समताधिष्ट समाज व्यवस्थेचा उद्धाता, न्यायप्रिय राजा असा अनेक गुणांचा आविष्कार करणारा महात्मा राजा होता. अशा रावणाबद्दल काही षडयंत्रकारी व्यवस्थेने बदनाम करण्याचा कोणताही कसूर ठेवलेला नाही.वास्तविक राजा रावणासारखा महापराक्रम योद्धा झाला नाही यापुढेही होणार नाही.

तामिळनाडूमध्ये रावणाची २५२ मंदिरे आहेत. सर्वात मोठे मंदिर व मूती मध्यप्रदेशात मंदसौर येथे अंदाजे १५ मीटर उंची इतकी मूती आहे. महाराष्टात अमरावती जिल्ह्यात मेळघाट छत्तीसगड मध्यप्रदेश, झारखंड येथे राजा रावणाची पूजा केली जाते. रावण हे आदिम जमातीचे दैवत आहे.

# १५ दिवसांत मिळणार ५० हजारांचे प्रोत्साहन अनुदान



### प्रोत्साहन अनुदानाची स्थिती

एकूण लाभार्थी-२८.१४ लाख

सरकारने मंजूर केले-१०,००० कोटी

प्रत्येक लाभार्थीचे अनुदान-५०,०००

वाटपापूर्वीचे टप्पे-३

**गोंदिया :-** राज्यातील २८ लाख शेतकऱ्यांना महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत अल्पमुदत पीककर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. बँकांनी दिलेल्या याद्यांची छाननी आता पूर्ण झाली आहे. आधार प्रमाणीकरणानंतर अंतिम याद्या प्रसिध्द होऊन त्याचे चावडी वाचन होईल. त्यानंतर १५ दिवसांत अनुद-ानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बचत खात्यात जमा केली जाणार आहे.

२०१४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना दीड लाखांची कर्जमाफी दिली. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारने दोन लाखांची कर्जमाफी दिली. तसेच नियमित कर्जदारांच्या प्रोत्साहन अनुद-ानात २५ हजारांची वाढ केली. पण, कोरोनामुळे तिजोरीत पैसाच नव्हता. त्यामुळे कर्जाची नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना अडीच वर्षे वाट पाहावी ला-गली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूर्वीच्या निकषात काही बदल करीत शेतकऱ्यांना दिल-ासा देण्याचा प्रयत्न केला. २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षांत दोन वर्षे कर्जाची नियमित परफेड केली असल्यास त्यांना अनुदान देण्याचा निर्णय झाला. २०१९ मध्ये अतिवृष्टी, महापुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ दिला जाणार आहे. कृषी विभाग व बँकांकडून प्राप्त याद्यांची छाननी पूर्ण झाल्यानंतर आता अंतिम याद्या जाहीर करण्याची तयारी सहकार विभागाने केली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधीपण जाहीर होऊ शकतात. त्यामुळे आचारसंहितेपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण केली जात आहे.

### याद्यांचे होणार चावडी वाचन

**आयकर भरणारा, शासकीय नोकरदार, आमदार, खासदार, माजी मंत्री, २५ हजारांपेक्षा जास्त मासिक निवृत्तीवेतन असलेल्या व्यक्ती (शेतकरी) कर्जमाफीतून वगळण्यात आल्या आहेत. तरीपण, छाननीनंतर आता आठ दिवसांत अंतिम याद्या प्रसिध्द केल्या जातील. त्यानंतर गावोगावी ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर त्या याद्या लावून त्याचे चावडी वाचन होईल. शेवटी बँक खात्याशी आधार प्रमाणीकरण करुन संबंधित पात्र शेतकऱ्यांच्या बचत खात्यात अनुदानाची रक्कम वर्ग केली जाणार आहे. २० ऑक्टोबरपूर्वी हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आल्याची माहिती सहकार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.**

# सैनिक गाव म्हणून कातुर्ली ठरले "आयकॉन" "कातुर्ली वॉरियर्स"करणार अभ्यागतांचे स्वागत

## अडीच हजार लोकवस्तीत तब्बल ३२ जवान : दोन तरुणींचाही समावेश



**गोंदिया:-** देशाचे रक्षण करण्याची जबाबदारी सैन्यावर आहे. मात्र सैन्यात माझ्याघरचा नव्हे, तर बाजूच्या घरचा जावा, हा २००० सालापर्यंतचा समज होता. तो समज खोडून काढत आमगाव तालुक्यातील एका लहानशा कातुर्ली नावाच्या गावाने संपूर्ण जिल्ह्यात आज आपले नाव लौकिक केले आहे. १९९० च्या दशकातच या गावाने दोन जवान देशाने दिले. जवळपास अडीच हजार लोकसंख्या असलेल्या गावाने आत्तापर्यंत तब्बल ३२ जवान भारतीय सैन्य दलाच्या विविध शाखांमध्ये दिले आहे. त्यात दोन तरुणींचाही समावेश असून उच्चस्तरीय अधिकारी होण्याचा मान देखील यातील जवानांना मिळाला. हे गाव एक आदर्श गाव म्हणून जिल्ह्याच्या नकाशावर झळकत आहे.

या जवानांनी देखील आता गावाप्रती कृतज्ञता व्यक्त करत समाजालाही काही देणं लागते, या भावनेतून गाव विकासात हातभार लावण्यास सुरुवात केली. गावाच्या सुरुवातीलाच एक भव्यदिव्य अशा प्रवेशद्व-ाराचे बांधकाम करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. गा-वात येणाऱ्या प्रत्येक अभ्यागतांचे स्वागत "कातुर्ली वॉरियर्स' रेखाटलेल्या प्रवेशद्वाराच्या माध्यमातून स्वागत करण्यात येणार आहे. या बांधकामाचे भूमिपूजन रविवारी थाटात पार पडले.

कातुर्ली वॉरियर्स सैनिक समितीचे अध्यक्ष प्रेमलाल पटले यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच केशरीचंद बिसेन यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. विशेष अतिथी म्हणून जि. प. सदस्य किशोर महारवाडे आणि प्रमुख अतिथी म्हणून यावेळी गावातील आठ माजी सैनिक, चार कार्यरत सैनिक तसेच गावातील गणमान्य नागरिकांची उपस्थिती होती. संचालन समितीचे कोशाध्यक्ष माजी सैनिक गणेश बिसेन यांनी केले. प्रवेशद्वाराचे बांधकाम येत्या काही दिवसांतच पूर्ण होणार आहे. त्यानंतर या गावात प्रवेश करताच कातुर्ली वॉरियर्स लिहिलेले द्वार गावात येणाऱ्यांचे स्वागत करणार आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजुंच्या खांबांवर आत्तापर्यंत असलेल्या सैनिकांची नावे लिहिली जाणार असून याप-ुढे देखील सैन्यात जाणाऱ्यांची नावे समाविष्ट करण्यात येणार आहेत. कातुर्ली गावात भारतीय सैन्यात असलेल्या जवान राबवित असलेल्या या उपक्रमाचे संपूर्ण परिसरात कौतूक करण्यात येत आहे.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर जय जवान, जय किसान असा नारा तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी दिला होता. देशाला हे दोनच घटक वाचवू शकतात, असा त्यांचा ठाम विश्वास होता. देशातील नागरिकांचे पालन-पोषण करण्याकरिता जशी शेतकऱ्याची गरज आहे. तशीच काम देशाला परकीय शक्तींपासून वाचविण्याचे काम देशाच्या सिमेवर लढणारे जवान करतात. मात्र सैन्य म्हणजे घरापासून महिनोमहिने लांब राहणे. कधी जीवाचे काय होईल, याचा नेम नाही. त्यामुळे समजून-उमजून देखील सैन्याचा मान राखत असले तरी सहसा कुणीही आपल्या पाल्याला किंवा घरच्या मुलाला सैन्यात पाठविण्यासाठी फारसे लक्ष घालत नव्हते.

नोकरी नसेल तरी चालेल, शेती कसून घरातच राहा, असा समज होता. मात्र देशासाठी काहीतरी करायची जिद्द उराशी बाळगून आमगाव तालुक्यातील अगदी खेडेगाव असलेल्या कातुर्ली या गावातून प्रेमलाल पटले आणि कुंवरलाल बिसेन हे दोन तरुण घरच्यांचा विरोध पत्करुन सैन्य भरतीला गेले. त्यांची निवड देखील झाली. ते गावात यायचे तेव्हा त्यांची शिस्त आणि रुबाब बघून इतर तरुणांना देखील त्यातून प्रेरणा मिळाली. बघता बघता सैन्यात भरती होण्याची चढाओढ निर्माण झाली.

तालुका आणि जिल्हा मुख्यालयापासून २० किलोमीटर अंतरावर असलेल्या आणि गा-वात सराव तसेच मार्गदर्शनाची कसलीही सोय नसताना देखील येथून सैन्यात जाणाऱ्यांची फौज तयार झाली. आजघडीला या गावातील ३२ जण भारतीय सैन्याच्या विविध दलांत कार्यरत आहेत.

त्यात भारतीय सैन्यदल, केंद्रिय राखीव पोलीस दल, सिमा सुरक्षा दल, आयटीबीपी, सर्व अर्धसैनिक दलात ते कार्य करत आहेत. यात एका महिलेचा देखील समावेश आहे. या गावात अद्यापही सैन्य दलात जाणाऱ्यांची संख्या कमी नाही. दरवर्षी येथे भरतीत जाणाऱ्यांची रांग लागते. जिल्ह्यातच नव्हे, तर राज्यात गावाचे नाव सर्वाधिक सैन्य असलेल्या कर्मचाऱ्यांचे गाव म्हणून नाव-ारुपास आणण्याचे ध्येय येथील तरुणांनी उराशी बाळगले आहे. हे गाव आजघडीला सैन्य दलात जाण्याची तयारी करणाऱ्यांचे आयकॉन ठरले आहे.


### एक महिला पोलीस अधिकारी

**ज्या प्रमाणे कातुर्ली गावातील तरुण भारतीय सैन्यदल आणि इतर तत्सम दलांमध्ये भरती होण्याकरिता धडपडले. तसेच महाराष्ट्र पोलीस दलात देखील भरती होण्यासाठी अनेकांची धडपड कायम आहे. त्यातच दोन वर्षांपासून मोसमी कटरे ही तरुणी पोलीस दलात अधिकारी म्हणून रुजू झाली.**




### वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही पदे

**कातुर्ली गावातील तरुणांनी केवळ सैन्यात जावून शिपाई म्हणूनच काम करावे, हे ध्येय ठेवले नाही. तर पुढे जाण्याची जिद्द उराशी बाळगत वरिष्ठ पदांपर्यंत मजल मारली. प्रेमलाल मोहनकर सुभेदार मेजर, सुभेदार माणिक बिसेन, नायब सुभेदार लोकचंद कुंभलकर, अनिल भेलावे, ऑनररी नायब सुभेदार गणेश बिसेन, हवालदार म्हणून प्रेमलाल बिसेन, कुवरलाल बिसेन कामगिरी बजावत आहेत. एकूणच गावातील एक सुभेदार मेजर, एक सुभेदार, तीन नायक सुभेदार आणि २७ विविध पदांवर अन्य आहेत.**

साप्ताहिक **बेरार टाईम्स** निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.०५ ऑक्टोंबर २०२२ २

## संपादकीय

# राहुल यात्रा जोडणारी की तोडणारी?

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा सध्या देशभरात चर्चेचा विषय बनत आहे, तर महाराष्ट्रातील माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे नेते अशोकराव चव्हाण हे देखील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांमुळे भारत जोडो यात्रेचा कार्यक्रम कसा होईल, यावर तर्कवितर्क लावले जात आहेत. काँग्रेसचे अशोकराव चव्हाण यांचा भाजपमधील पक्षप्रवेश तळ्यात मळ्यात असताना राहुल गांधी यांच्या यात्रेचा महाराष्ट्रात फज्जा उडेल की काय? अशी भीती काँग्रेसच्या दिल्लीस्थित पक्षश्रेष्ठींना आजही आहे. नांदेड जिल्ह्यात ५ नोव्हेंबर रोजी राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा पोहोचणार आहे. नांदेड जिल्ह्यात राहुल गांधी हे सहा दिवस व सहा रात्र मुक्काम करणार आहेत. महाराष्ट्रातील काँग्रेसच्या दृष्टीने पुढील राजकीय गणित ठरविणारी ही भारत जोडो यात्रा अशोकराव चव्हाण यांच्यासाठी व त्यांच्या राजकीय भविष्यासाठी लक्षणीय ठरणार आहे.

राहुल गांधी यांचा नांदेड जिल्ह्यात असणारा मुक्काम अशोकराव चव्हाण यांची सत्त्वपरीक्षा घेणारा ठरणार आहे. भारत जोडो यात्रेनिमित्त काँग्रेस पक्षातील राज्य व राष्ट्र पातळीवरील वरिष्ठ नेत्यांनी सध्या नांदेड जिल्ह्यात मुक्काम ठोकला आहे. ज्या मार्गावरून राहुल गांधी यांची ही यात्रा जाणार आहे, त्या मार्गाची पाहणी करण्याचे काम काँग्रेसच्या नेत्यांकडून सध्या सुरू आहे. अशोकराव चव्हाण यांच्यासमवेत काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी मंत्री नसीम खान, माजी मंत्री रमेश बावगे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे चिटणीस संपत कुमार, आशीष दुवा, सोनम पटेल, महिला काँग्रेसच्या संध्या सव्वालाख, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी, सरचिटणीस विनायक देशमुख, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत ही मंडळी भारत जोडो यात्रेच्या मार्गाची पाहणी करत आहेत. काँग्रेसची राज्य व राष्ट्र पातळीवरील नेतेमंडळी नांदेड मुक्कामी असल्यामागचे कारणही वेगळेच असल्याचे बोलले जात आहे. अशोकराव चव्हाण यांच्या काँग्रेस पक्ष सोडण्याच्या चर्चेमुळे भारत जोडो यात्रेवर परिणाम होऊ नये यासाठी खुद्द राहुल गांधी यांनीच ही दक्षता घेतली असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. भाजपचे नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी अशोकराव चव्हाण यांची मुंबईत झालेली भेट तसेच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमात नांदेडमध्ये १७ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी अशोकराव चव्हाण यांची झालेली जवळीकता लक्षात घेऊन राहुल गांधी यांनी वेळीच सावध होऊन विशेष दक्षता घेतली आहे. काँग्रेसला यात्रेदरम्यान महाराष्ट्रात धोका होऊ नये म्हणून नवी दिल्ली येथील एक वेगळी काँग्रेसची टीम नांदेडमध्ये विशेष लक्ष ठेवून आहे. तसे पहिले तर काँग्रेसचे नेते अशोकराव चव्हाण यांनी भाजप प्रवेशाबाबत स्पष्टपणे अद्यापही वक्तव्य केलेले नाही; परंतु एक धूर्त राजकारणी याप्रमाणे त्यांनी अलीकडेच एकनाथ शिंदे यांच्याविषयी केलेल्या वक्तव्यामुळे त्यांचा नेमका निशाणा कोणावर होता हे येणारा काळच सांगू शकेल.

नांदेड जिल्ह्यात देगलूर, नायगाव, नांदेड, अर्धापूर असा १२० किलोमीटरचा टप्पा ही भारत जोडो यात्रा पूर्ण करणार आहे. त्यानंतर ही यात्रा हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी, हिंगोली त्यानंतर विदर्भातील वाशिम, अकोला, शेगाव, बुलढाणा, जळगाव जांबूत या मार्गाने मध्य प्रदेशात जाणार आहे. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा बारा राज्यांमध्ये तसेच दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये ३५७० किलोमीटरचा प्रवास करणार आहे. आजपर्यंत या यात्रेने ६७५ किलोमीटरचा टप्पा पूर्ण केला आहे. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात ३६८ किलोमीटरचा प्रवास पूर्ण करणार आहे.

तर राहुल गांधी यांचा महाराष्ट्रात १८ रात्र मुक्काम असणार आहे. त्यापैकी तब्बल सहा रात्र त्यांनी नांदेड जिल्ह्यात राहणे पसंत केले आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांची संख्या पाहता व राहुल गांधी यांचा महाराष्ट्रातील मुक्काम लक्षात घेता नांदेड जिल्ह्यातील सहा रात्रीचा मुक्काम बरेच काही सांगून जाते. एकंदरीत काँग्रेसची भारत जोडो यात्रा राहुल गांधी यांच्यासाठी खूप वेगळी असली तरी ही यात्रा महाराष्ट्रासाठी व अशोकराव चव्हाण यांच्यासाठी वेगळीच परीक्षा घेणारी ठरणार आहे. राजकारणात कधी काय होईल, हे कोणालाही सांगता येत नाही. एका रात्रीतून चित्र पलटू शकते, हे महाराष्ट्रातील जनतेने यापूर्वीही अनेकदा पाहिले आहे. ही यात्रा नांदेडमध्ये येईपर्यंत किंवा नांदेडमध्ये आल्यावर किंवा नांदेडमधून गेल्यानंतर अशोकराव चव्हाण यांचा भाजप प्रवेश झाला, तर ते आश्चर्य वाटण्यासारखे नसावे. तसेच त्या प्रवेशाचे नांदेड जिल्ह्यात कोणालाही नवल वाटणार नाही. भाजप हा शिस्तीचा पक्ष आहे. त्यामुळे भाजपमध्ये शिस्तीला फार महत्त्व आहे. भाजप कधी, कोणाला कशा पद्धतीने पक्षांमध्ये प्रवेश देईल, हे सध्या तरी कोणालाही सांगता येणार नाही व याचा काही नेम नाही. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात काँग्रेस पक्षासाठी जोडणारी ठरेल की तोडणारी हे देखील येणारा काळच सांगेल.

# आदर्श सार्वजनिक वाचनालयचा ४१ वा वर्धापन दिन उत्साहात



**गोरेगाव:–** तालुक्यातील "अ' दर्जा प्राप्त आदर्श सार्वजनिक वाचनालय मोहाडी येथे २ ऑक्टोबंरला ग्रंथालयाचा ४१ वा वर्धापन दिन तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सेवानिवृत्त उपवनसंरक्षक यु.टी.बिसेन हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी आमदार व गोंदिया जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष दिलीप बंन्सोड, माजी जि.प.सदस्य जगदीश येरोला,के.के.डोंगरे, डुमेश्वर चौरागडे, संस्थेचे संस्थापक सचिव ग्रंथमित्र वाय.डी.चौरागडे, संस्थेचे उपाध्यक्ष मदनलाल बघेले, संस्थेचे सदस्य हिरालाल महाजन, देवदास चेचाने, सुभाष चौरागडे, चंन्द्रकुमार चौरागडे आदी मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक दिलीप बंन्सोड यांनी ग्रामीण भागात ग्रंथालय स्थापन करून नवयुवकांना वाचनाची आवड निर्माण करुन ग्रंथ, वर्तमान पत्राचे वाचन करण्याचे आवाहन केले. ग्रंथालयाची प्रगती बघुन संचालक मंडळाचे अभिनंदन करीत मदत करण्याचे आश्वासन दिले.के.के.डोंगरे यांनी प्रत्येक व्यक्तीनी ग्रंथांचे वाचन करणे काळाची गरज आहे. प्रत्येक थोर पुरुषांच्या ग्रंथाच्या वाचनामुळे माणसाची प्रगती करता येते असे सांगितले. जगदीश येरोला यांनीही विचार व्यक्त केले. प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक सचिव ग्रंथमित्र वाय.डी.चौरागडे यांनी ग्रंथालयाचे मागील ४१ वर्षातील प्रगती अहवाल सादर करुन ग्रंथालयातील ग्रंथांचे जास्तीत जास्त नागरिकांनी वाचन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन कोषाध्यक्ष डी.आर.चौरागडे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे सदस्य जे.जे.पटले यांनी मानले.कार्यक्रमाला नरेंद्र कुमार चौरागडे, दुर्गेश चेचाने, मुकेश बिजेवार, आशा चेचाने, कुल्लू वरखडे आर्दीनी सहकार्य केले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)




भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध अभियानाचे आयोजन राज्यभरात करण्यात आले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने वर्धा येथे राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा समारोप, हॅलोऐवजी वंदे मातरम् अभियानाचा शुभारंभ, वर्धा जिल्हाधिकारी कार्यालय आणि नियोजन भवनाचे उद्‌घाटन यांबरोबरच ७५ नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ करण्यात आला आहे.

या सर्व उपक्रमांचा आणि नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ कार्यक्रम वर्ध्यातील जिल्हा क्रीडा संकुल येथे झाला असून या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती, याशिवाय या कार्यक्रमास महसूल मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, मॅगसेसे पुरस्कार विजेते आणि जलबिरादरीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय या कार्यक्रमाला खासदार रामदास तडस, आमदार नागोराव गाणार, रामदास आंबटकर, अभिजित वंजारी, रणजित कांबळे, दादाराव केचे, समीर कुणावार, डॉ. पंकज भोयर यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील नद्यांचे आरोग्य चांगले राहिले तरच आपले आरोग्य चांगले राहणार आहे आणि हेच ओळखून महाराष्ट्रातील गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिन्यांच्या खोऱ्यातील एकूण ७५ नद्यांचे संवर्धन करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. वर्धा येथील सेवाग्राममध्ये "चला जाणूया नदीला" या महोत्सवाचे देखील आयोजन करण्यात आले. राज्यातील ७५ नद्यांचे संवर्धन करीत असताना राज्यातील नद्यांची सद्यस्थिती नेमकी काय आहे. तसेच नदी संवर्धन करताना काय करणे आवश्यक आहे, याची दिशा मिळण्यास या महोत्सवाच्या माध्यमातून मदत होणार आहे.

या अभियानाचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून याबाबतचा शासन निर्णय पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने निर्गमित केला आहे. गठीत करण्यात आलेल्या समितीत मुख्य सचिव हे अध्यक्ष असून महसूल विभागाचे आणि ग्रामविकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव हे सदस्य आहेत. वन विभागाचे प्रधान सचिव या समितीचे कार्याध्यक्ष असतील. जलसंपदा, जलसंधारण, कृषी, शालेय शिक्षण, नगरविकास–२, पर्यावरण, उद्योग, पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय, पाणीपुरवठा व स्वच्छता या विभागाचे प्रधान सचिव या समितीमध्ये सदस्य आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक, महाराष्ट्र जैवविविधता मंडळ, नागपूर, पुण्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक, सांस्कृतिक कार्यचे सचिव आणि जल व भूमी व्यवस्थापन संस्था अर्थात वाल्मी या समितीत सदस्य आहेत. याशिवाय या समितीमध्ये अशासकीय सदस्य असणार आहेत. डॉ. राजेंद्र सिंग विशेष निमंत्रित तर डॉ. सुमंत पांडे, नरेंद्र चौघ, जयाजी पाईकराव, रमाकांत कुलकर्णी, डॉ. गुरुदास नुलकर, अनिकेत लौयीया, राजेश पंडित, महेंद्र महाजन या समितीत सदस्य आहेत, तर सांस्कृतिक कार्यसंचालनालयाचे संचालक या समितीत सदस्य सचिव आहेत. या समितीचा कार्यकाळ एक वर्ष अथवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत असेल.

महाराष्ट्राला वारंवार भेडसावणाऱ्या पूर आणि दुष्काळ या समस्यांपासून मुक्तीसाठी नदी संवाद अभियानाचे आयोजन करणे, अभियानाअंतर्गत जनसामान्यांना नदीसाक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे, त्याची अंमलबजावणी करणे, अमृत वाहिनी बनविण्यासाठी मसुदा तयार करणे, नदीचे स्वास्थ आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रूपरेषा आखणे, नदीचा तट आणि प्रवाह जैवविविधतेबाबत प्रत्येक जिल्ह्यात प्रचार, प्रसार व नियोजन करणे, नदीच्या पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करून त्यावर संबंधितांना कार्यवाहीसाठी अहवाल सादर करणे, पावसाचे पाणी अडवून भूजल स्तर उंचावणे, अतिक्रमण तसेच शोषण आणि प्रदूषण या तीन कारणांचा अभ्यास आणि त्याचा नदी व मानवी जीवनावर होणार परिणाम अभ्यासणे, महाराष्ट्रातील सुमारे ७५ नदी खोऱ्यांतून नदी संवाद यात्रा आयोजित करण्याबाबत आराखडा तयार करणे, शासनाबरोबर समाज आणि नदीवर काम करणाऱ्या संस्थांमध्ये सुसूत्रता आणणे, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे जलव्यवस्थापन तपासणे अशी या समितीची ध्येय आणि उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

### नदी संवर्धनासाठी विविध विभागांची मदत

या आगळ्या–वेगळ्या उपक्रमाबाबत मुनगंटीवार म्हणाले की, राज्यातील ७५ नद्यांचे संवर्धन करताना जलबिरादरी संस्थेच्या विशेष नैपुण्याची मदत घेतली जाणार आहे, तर राज्य शासनाचे जलसंपदा, जलसंधारण, वन इत्यादी विभाग यामध्ये जोडले जाणार आहेत. नदी संरक्षण आणि संवर्धनासाठी सांस्कृतिक कार्य विभाग काम करणार असून सांस्कृतिक कार्य विभागामार्फत महाराष्ट्रातील ७५ नद्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यातील एक नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाणार आहे. हे नोडल अधिकारी संबंधित नदीच्या विकासासाठी, पुनरुज्जीवनासाठी काम करतील. नदी यात्रेच्या माध्यमातून नद्यांचे आयुष्य चांगले कसे राहील, नदी ही अमृतवाहिनी कशी आहे, छोट्या नद्या पुनरुज्जीवित केल्या, तर त्याचा कसा फायदा होईल, या सर्वांची माहिती नदी यात्रेच्या दरम्यान देण्यात येणार आहे.

### नदी संवर्धन उपक्रमाला लोकसहभाग आवश्यक

यावेळी राजेंद्र सिंह म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना महाराष्ट्रात नदी महोत्सव आयोजित करणे, तसेच ७५ नद्यांचे पुनरुज्जीवन केले जाणे ही बाब अत्यंत आनंदाची आहे. राज्य शासनाच्या या मोहिमेत जलबिरादरीचा पूर्ण पाठिंबा असून आपल्या सर्वांसाठी नद्यांचे प्रदूषण थांबविणे, त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे याला महत्त्व असणार आहे. केवळ निधी देऊन नद्या स्वच्छ होणार नाहीत, तर यासाठी आपला नदीशी व्यवहार कसा आहे, आपले संस्कार काय आहेत आणि आपली आत्मदृष्टी यामध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे, तरच नदी स्वच्छ होईल. नदीला समजून घेताना नदीवर प्रेम करणे आवश्यक आहे. जसे नदी संवर्धन करण्यासाठी निधीचे नियोजन किंवा आराखडा आवश्यक आहे, त्याचप्रमाणे नदी संवर्धन कामाला लोकसहभागाची जोड मिळायला हवी.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, २ ऑक्टोबरला वर्धा येथील कार्यक्रमात राज्यातील विविध ७५ नद्यांचे जलनायक सहभागी झाले. तसेच जलबिरादरीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र सिंह यांच्यासह जलबिरादरीचे सदिच्छादूत अभिनेते चिन्मय उद्गीरकर उपस्थित होते. या कार्यक्रमात या जलनायकांकडे जलकलश आणि आपला ध्वज सुपूर्द करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. कलाम यांच्या जयंती दिनी म्हणजेच १५ ऑक्टोबरला राज्यातील ७५ नद्यांवर एकाच दिवशी नदी यात्रेला सुरुवात होईल. यावेळी राज्यातील नदी अभ्यासक, नदीप्रेमी, शेतकरी, विद्यार्थी, महिला सहभागी होणार आहेत. प्रत्येक नदीच्या यात्रेवेळी किमान १०० जण सहभागी होतील, असा विश्वास असून २६ जानेवारी २०२३ पर्यंत ही नदी यात्रा चालणार आहे. मुळातच नदी यात्रा किंवा नदी परिक्रमा आयोजित करण्यामागचा मुख्य उद्देश हा राज्यातील नद्यांची सध्याची परिस्थितीची माहिती घेणे हा आहे.

स्थानिक नागरिकांच्या लोकसहभागातून नदीचे आरोग्य चांगले राहावे, नदीचे संवर्धन व्हावे यासाठी नदी कशी स्वच्छ आणि संरक्षित ठेवणे आवश्यक आहे, याची माहिती यावेळी देण्यात येईल. पारंपरिक माहिती देत असताना आधुनिक विज्ञानाची जोड देऊन नदी संवर्धन आराखडा तयार करण्यात येणार असून त्या आराखडयाची राज्यभरात अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**वर्षा फडके-आंधळे**

# दिक्षाभूमीच्या निर्माणाचा इतिहास!

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी आयोजित धर्मांतर सोहळ्यात लाखो जनसमुदायासोबत बौद्ध धम्मची दीक्षा घेतली होती. त्यानंतर देशभरातील बौद्ध धर्मांतर सोहळा दिवस हा "धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून साजरा करतात. आज नागपूर मध्ये दीक्षाभूमीवर भारतातील सर्वात मोठा स्तूप उभा असून तो स्तूप देशातील सर्व बौद्धांचे उर्जास्थान बनले आहे.

धर्मांतर सोहळ्याला ६५ वर्षाचा काळ लोटला तरी दिवसेंदिवस दीक्षाभूमीचे महत्व वाढताना दिसतेय. त्यामुळे नव्या पिढीला ऐतिहासिक दीक्षाभूमीचा इतिहास माहिती असणे आवश्यक वाटते.

### दीक्षाभूमी जागेचा इतिहास

धम्मदीक्षेपूर्वी ही जागा वैक्सिन इन्स्टिट्यूटने गुरांच्या चरण्यासाठी राखून ठेवली होती. या जागेचे क्षेत्रफळ १४ एकर असून पडीत असलेली ही जागा त्यावेळी खाचखळगे, दगडधोंडे, लहान – मोठी झाडेझुडपे व गवतांचे रान होती. ही जागा दीक्षा समारंभासाठी मिळविण्यासाठी २८ सप्टेंबर १९५६ रोजी रीतसर अर्ज करण्यात आला आणि २८ सप्टेंबर १९५६ रोजी इन्स्टिट्यूटने "ना हरकत पत्र' दिले. त्यात ही अट होती की २८ सप्टेंबर १९५६ ते ११ ऑक्टोबर १९५६ पर्यंत या जागेत गुरे चरण्यास येत राहतील व १५ ऑक्टोबर १९५६ नंतर ही जागा गुरांच्या चरण्यासाठीच पुन्हा उपयोगात आणली जाईल.

दीक्षाभूमीवर पहिला बुद्धस्तंभ १३ एप्रिल १९५७ ला एका रात्रीतून बाबू हरिदासजी आवळे यांच्या नेतृत्वात तयार करण्यात आला. बुद्ध स्तंभ हा मेंढे गुरूजी ( भिक्खू धीरधम्म ) यांनी एका रात्रीतून बांधला. स्तंभावरील बुद्धमूर्ती भीमराव गजघाटे रा. पाचपावली, नागपूर यांनी तयार केली. (प्रल्हाद मेंढे गुरूजी, रा. कर्नलबाग, पत्र १२ जून १९९६) सोबतच अनेक कार्यकर्त्यांनी बुद्ध स्तंभ उभारण्यास आवळे बाबूस सहकार्य केले होते.

बुद्ध स्तंभास धोका पोहचू नये म्हणून एक रखवालदार आणि स्तंभाशेजारी एक लहानसे पत्र्याचे शेड उभारण्याचे ठरविले होते. त्यासाठी मेंढे गुरूजी यांनी सामानही आणले होते. परंतु प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याच्या आदल्या दिवशीच सीताबर्डी पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याने सर्व साहित्य बेकायदेशीर समजून उचलून नेण्याचा प्रयत्न केला. नागपूरच्या नझूल तहसीलदाराने "लँड रेव्हेन्यू ॲक्ट' मध्यप्रदेश सेक्शन २२९ च्या आधारे स्मारक समितीच्या बुद्ध महासभेच्या आणि शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या प्रमुख पुढाऱ्यांवर खटला भरला.

स्मारक समितीचे कार्यवाह आर. आर. पाटील यांनी कोर्टात दीक्षाभूमीवरील स्तंभ कुणी बांधला हे माहित नसल्याचे सांगितले. कर्मवीर आवळे बाबूंनी दीक्षाभूमीवरील स्तंभ बांधल्याचे कोर्टात कबूल केले. त्यामुळे आवळे बाबूवर केस चालून शेवटी कोर्टाने त्यांची निर्दोष मुक्तता केली. त्या केसचा नंबर १२४–१–५२ ए ऑफ ५७–५८ होता. यावरून दीक्षाभूमीवरील स्तंभ उभारण्यात वर नमूद केलेल्या व्यक्तींचे बहुमूल्य सहकार्य लाभले होते. केवळ एकट्या व्यक्तीचे ते कार्य नव्हते. ( प्रल्हाद मेंढे गुरूजी, रा. कर्नलबाग, पत्र ८ जून १९९६ ).

### दीक्षाभूमीची जमीन मिळावी म्हणून दादासाहेबांचे प्रयत्न

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर मुंबईच्या दादर चौपाटीवर चैत्यभूमीची जमीन व नागपूरची दीक्षाभूमीची जमीन मिळावी म्हणून कर्मवीर दादासाहेब गायकवाड प्रयत्न केले. तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी दीक्षाभूमीची १० बाय १० फूट जमीन देतो असे उर्मटपणे म्हटले. तेव्हा दादासाहेब गायकवाड यांनी लढा दिला.

मराठी भाषकांचा संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर १५ ऑगस्ट १९६१ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी डॉ. आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी नागपूर या संस्थेला १४ एकर जमीन हस्तांतर केली. या विजयानंतर स्मारक समितीचे कार्यालय दीक्षाभूमी नागपूर येथे उभारण्यात आले. त्याचा शिलान्यास ३० सप्टेंबर १९६१ रोजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते बसविण्यात आला.

१३ जून १९६३ रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूर या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाली. तेव्हापासून दीक्षाभूमी येथील कार्याला प्रारंभ झाला. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे २९ डिसेंबर १९७१ रोजी झाले. त्यांच्यानंतर १९७२ साली आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीच्या अध्यक्षपदी रा.सू.गवई यांची निवड झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली दीक्षाभूमीचे कार्य जोरात सुरु झाले.

स्मारक समितीच्या कार्यात यशवंतराव आंबेडकर, रेवाराम कवाडे (गुरुजी ), ॲड. एन.एच. कुंभारे (समितीचे सदस्य व कार्याध्यक्ष), ॲड.डी.एम.गजभिये, सी.एम.आरमुघम, आर.आर.पाटील, वा.को.गाणार, संपतराव रामटेके आणि डॉ.स.वि.रामटेके यांचे संपूर्ण सहकार्य होते. या सर्वांची आठवण बाबासाहेबांच्या स्मारकाच्या रूपात कायम राहील.

स्मारक उभारणीत नागपूरचे सदानंद फुलझेले यांनीही मोलाची कामगिरी बजावली आहे. बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्धधम्माची दीक्षा घेतली व लाखो अनुयायांना दीक्षा दिली त्यावेळी फुलझेले हे नागपूर महानगरपालिकेचे उपमहापौर होते. उपमहापौर या नात्याने त्यांनी दीक्षा समारंभप्रसंगी व्यवस्था करण्याची जबाबदारी पार पाडली होती.

### दीक्षाभूमीवर देशातील सर्वात मोठा स्तूप उभारला

दीक्षाभूमी येथील १४ एकर जागेवर देशातील सर्वात मोठा स्तूप उभारण्यात आला. यावर तीन कोटी रुपये खर्च करण्यात आले. स्तूपाची उंची १२० फूट असून स्तुपाचे शिल्पकार शिवदानमल आहेत. स्तूपाच्या चारही दिशेला जगप्रसिद्ध सांची स्तूपासारखे अप्रतिम तोरणद्वार उभारले आहेत. या स्तुपाचा कोनशीला समारंभ २७ जून १९७८ साली जागतिक बौद्ध परिषदेचे अध्यक्ष पूज्य भदन्त आलबर्ट एडिरेसिंगे (श्रीलंका) यांच्या हस्ते सकाळी १० वाजता करण्यात आला.भव्य दिव्य स्तूपाचे उद्घाटन राष्ट्रपती के.आर.नारायणन यांनी १८ डिसेंबर २००१ रोजी केले.

अशोक विजयादशमीच्या पावन पर्वावर देशभरातून लाखो अनुयायी येथे मोठ्या श्रद्धेने येतात. नागपूरात या सोहळ्याकरिता बिहार, उत्तरप्रदेश , मध्यप्रदेश, कर्नाटक, मद्रास येथूनही लोक येत आहेत. नागपूरातील विविध वस्त्यांमध्ये जवळपास ३५० बौद्ध विहारे आहेत. हे त्यातील सर्वात मोठे आहे. या भव्य दिव्य स्तूपाचे उद्घाटन महामहिम राष्ट्रपती के.आर.नारायणन यांनी १८ डिसेंबर २००१ रोजी केले.

.आज रोजी स्मारक समिती चे अध्यक्ष पुज्य भंते आर्य नागार्जुन सुरई ससाई हे आहेत.तर सचिव सुधीर सदानंद फुलझेले हे आहेत.

# अंबिका वाचनालयात गांधी व शास्त्री जयंती उत्साहात



**गोंदिया:–** तालुक्यातील अंबिका सार्वजनिक वाचनालय कारंजा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श विद्यालयाचे प्राचार्य डी एम.राऊत होते. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून से.नि.कनिष्ठ लेखाधिकारी फनेंद्र हरिणखेडे, सामाजिक कार्यकर्ते श्रीराम रहमतकार उपस्थितीत होते.

कार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना श्री.हरिणखेडे यांनी वाचनालायाची स्थापना स्व.श्रधेय लक्ष्मणराव मानकर गुरुजी यांच्या विचारांचा प्रभावाने संस्थेचे संस्थापक सचिव टेकचंद बलभद्रे यांनी केल्याचे सांगत वाचनालयाच्या माध्यमातून वाचनाची आवड निर्माण होत असल्याचे विचार मांडले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डी.एम.राऊत यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनावर प्रकाश टाकत वाचनालयात दरदिवशी अभ्यास करणाऱ्या व स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांची पुस्तके भरपूर प्रमाणात उपलब्ध करून देण्यात यावी अशी सूचना केली.

कार्यक्रमाला सरपंच धनवंताबाई उपराडे, सर्व ग्राम पंचायत सदस्य तसेच पूर्व.माधयमिक शाळा कारंजाचे मुख्यधयापक, गावातील सर्व गणमान्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे उपाध्यक्ष विठ्ठलराव हरडे यांनी केले. तसेच आभार लंस्थेचे सदस्य मारोती भिमटे यांनी मानले. कार्यक्रमात सर्व वाचनालयाचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# विजयादशमी निमित्त वांढरा येथे भव्य भजन स्पर्धेचे आयोजन

**देवरी–** देवरी तालुक्यातील वांढरा (चिचगड) येथे विजयादशमीच्या निमित्ताने येत्या गुरूवारी (दि. ६) एका भव्य भजन स्पर्धेचे आयोजन वांढराच्या श्रीराम प्रासादिक आदिवासी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे प्रदेश महासचिव डॉ. नामदेव किरसान हे राहणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन गोंदिया जि.प.चे सदस्य उषा शहारे यांचे हस्ते होईल. सहउद्घाटक म्हणून जिप सदस्य राधिका धरमगुळे, उपाध्यक्ष म्हणून इंदल अरकरा, नीता कुंजाम, मीरा कुंजाम, रंजीत कासम, मोतीलाल पिहिदे, उमेश बागडेहरिया आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# "माता सुरक्षित तर घर सुरक्षित"

घरातील स्त्री आपल्या कुटुंबासाठी विविध भूमिका अदा करत असताना तिचे स्वत:च्या प्रकृतीकडे दुर्लक्ष होते. कुटुंबाप्रति असणारी प्रेमाची भावना, मातृत्वाचा ओलावा आणि आपल्या कर्तव्याप्रति असणारी संवेदनशीलता यामुळे ती घरासाठी राबते, प्रसंगी स्वत:च्या गरजा, भावना, शरीर, प्रकृती याकडे लक्ष देत नाही. कुटुंबाची काळजी घेणाऱ्या माता–भगिनिंच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्य शासनाने नवरात्रीच्या निमित्ताने "माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियान हाती घेतले आहे.

राज्यात १८ वर्षावरील महिला, माता, गरोदर स्त्रीया यांच्या आरोग्य तपासणीसाठी २६ सप्टेंबरपासून अभियानाला सुरुवात झाली आहे. येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत जरी अभियान कालावधी असला तरी राज्यातील सर्व महिलांची आरोग्य तपासणी होईपर्यंत अभियान सुरू ठेवण्याचा निर्धार आरोग्यमंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी व्यक्त केला आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने हे अभियान राबविण्यात येत आहे.

राज्यातील १८ वर्षावरील महिलांना, मातांना, गरोदर स्त्रीयांना प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे आणि सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समूपदेशन सुविधा उपलब्ध करुन देणे हे उद्दिष्ट आहे. या काळात सकाळी ९ ते दुपारी २ या दरम्यान वैद्यकीय अधिकारी आणि स्त्रीरोगतज्ज्ञामार्फत तपासणी, औषधोपचार, सोनोग्राफी आणि समुपदेशन करण्यासाठी मेडिकल, डेंटल शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. विविध आजाराशी संबंधित तज्ज्ञांचेदेखील सहकार्य घेण्यात येत आहे.



आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, सेवक यांच्यामार्फत घर–घरी जाऊन उपलब्ध सुविधेबाबत माहिती देण्यात येत आहे. ३० वर्षावरील सर्व महिलांचे कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान नाक घसा व इतर आजारांचे निदान व आवश्यकतेनुसार उपचार व समुपदेशन करण्यात येत आहे. अतिजोखमींच्या मातांचे/महिलांचे निदान करुन त्यांना आवश्यकतेनुसार उपचार आणि संदर्भ सेवा देण्याचे तसेच जास्तीत जास्त महिलांची आरोग्य तपासणी, शस्त्रक्रिया होतील याचे नियोजन करण्यात आले आहे. या कालावधीत मानवविकास कार्यक्रमाअंतर्गत तज्ज्ञांची शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत, तसेच भरारी पथकामार्फत देखील त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांमध्ये सेवा पुरविण्यात येत आहेत.

आरबीएसके पथकामार्फत शाळा तपासणी नंतर गावात भेट देवून तपासणी आणि समुपदेशन कार्यक्रम घेतले जात आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत महिला व बाल कल्याण विभागाच्या समन्वयाने अंगणवाडी केंद्रात असे कार्यक्रम आयोजित केले आहेत. कुटुंब कल्याण कार्यक्रमाची माहिती सर्व स्तरावर देण्यात येत आहे तसेच नवविवाहीत जोडप्यांना व एक अपत्य असणाऱ्या मातांना दोन अपत्यामध्ये अंतर ठेवण्याबाबत तसेच दोन अपत्यावरील मातांना कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया वरील माहिती देण्यात येणार आहे.

अभियानाच्या पहिल्या दोनच दिवसातील आरोग्य तपासणीत ४ हजारापेक्षा अधिक महिलांना मधुमेह तर १० हजारपेक्षा अधिक महिलांना उच्च रक्तदाबाचा त्रास आढळला. वेळीच आजाराचे निदान झाल्याने महिलांना उपचार घेणे सुलभ होणार आहे. आरोग्य शिबिरात औषधे देण्याची सुविधादेखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. गंभीर आजारावर महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना किंवा आयुष्मान भारत योजनेअंतर्गत शस्त्रक्रियादेखील करण्यात येणार आहे.

नवरात्र हा स्त्री शक्तीचा जागर आहे. या उत्सवाच्या महत्वाशी सुसंगतच हे अभियान आहे. महिला शक्तीचे कुटुंबासह देशाच्या विकासात असलेले महत्वाचे स्थान लक्षात घेऊन ती सक्षम असावी यासाठी तिच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. तिच्या आरोग्याची काळजी घेऊन आपण तिच्याप्रती असणारी कृतज्ञता व्यक्त करुया! घरातील आणि परिसरातील महिलांनी आरोग्य तपासणी करावी यासाठी हे अभियान प्रत्येक घरापर्यंत पोहाचवूया!

***-जिल्हा माहिती कार्यालय पुणे***

# ज्येष्ठांनी दिलेल्या ज्ञानातून संस्कारक्षम पिढी घडत असते

**गोंदिया :** समाजाचे नागरिकीकरण व औद्योगिकीकरण झाल्याने संयुक्त कुटुंब या संकल्पनेचा ऱ्हास झा-लेला आहे. भारतीय संस्कृती टिकवण्यासाठी आई-वडील, आजी-आजोबासारखे वयोवृध्द व्यक्ति हे एक चांगले माध्यम असून तरुण पिढीला नैतिक मूल्यांचे शिक्षण हे त्यांच्याकडून मिळत असते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या वयोवृध्द आई-वडीलांचा तसेच इतर ज्येष्ठांचा आदर सन्मान करावा. ज्येष्ठांनी दिलेल्या ज्ञानातून संस्कारक्षम पिढी घडत असल्याने त्यांना चांगली वागणूक द्यावी, असे आवाहन जागतिक ज्येष्ठ नागरीक दिनानिमीत्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विविध वक्त्यांनी केले.




जागतिक ज्येष्ठ नागरीक दिनानिमीत्त गोंदिया जिल्ह्यातील जेष्ठ नागरीकांसाठी निःशुल्क आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन समाज कल्याण विभागाच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी वक्त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

"सेवा पंधरवाडा" (कर्तव्यपथ) या अभियाना अंतर्गत सामाजिक न्याय विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याअनुषंगाने १ ऑक्टोंबर रोजी "जागतिक जेष्ठ नागरीक दिन" निमित्त सहायक युक्त, समाज कल्याण, गोंदिया यांचे मार्फत सामाजिक न्याय भवन, गोंदिया येथे निःशुल्क आरोग्य तपासणी शिबीर, जेष्ठ नागरीकांकरीता असणारे कायदे व त्यांचे अधिकार, वृध्दपकाळात होणारे आजार, उपाययोजना व उपचारासाठी असलेल्या शासकीय योजना या विषयांवर तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आलेले होते.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी अध्यक्ष जेष्ठ नागरीक सेवा संघ नारायण प्रसाद जमाईवार हे होते. प्रमुख अतिथी दुलीचंद बुध्दे, समन्वयक, जेष्ठ नागरीक सेवा संघ, जेष्ठ नागरीकाचे कायदे व त्यांचे अधिकार याविषयावर एस. व्ही. पिंपळे सचिव जिल्हा विधी सेवा प्रधीकरण यांनी मार्गदर्शन केले. वृध्दपकाळात होणारे आजार, उपाययोजना व उपचारासाठी असलेल्या शासकीय योजना या विषयावर डॉ. अमित जोगदंड सहायोगी प्राध्यापक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी मार्गदर्शन केले. तर वृध्दानकरीता युवकांचे कर्तव्य व जबाबदारी या विषयावर डॉ. माधुरी नासरे प्राध्यापिका गर्ल्स कॉलेज यांनी आपले विचार व्यक्त केले.

ज्येष्ठ नागरिकांच्या शारीरिक, सामाजिक व कौटुंबिक समस्या सोडविण्यासाठी तसेच त्यांना आवश्यक सहाय्यता करण्यासाठी जेष्ठ नागरिक धोरण राज्य शासनाने अंमलात आणले आहे. वयोवृद्धांचे समस्यांची सोडवणूक करुन त्यांचे जीवन सुसह्य करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाव्दारे विविध योजना राबविण्यात येतात. ज्येष्ठांकडून मिळणारा ज्ञानाचा वारसा जपून ठेवण्यासाठी तसेच त्यांचाप्रती सन्मान व आदराची जाणीवजागृती करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक दिन जगात सर्वत्र साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने विविध विभागाने ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ द्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण विनोद मोहतुरे यांनी केले.

कार्यक्रमामध्ये राजीव गांधी समाजकार्य महाविद्यालय, गोंदिया या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी "आधार कोना मागू मी" व "विसरली रक्ताची नाती" या विषयावर पथनाटय सादर केले. कार्यक्रमाचे संचालन आशिष जांभुळकर यांनी केले तर व आभार प्रदर्शन श्रीमती कापसे यांनी केले. आरोग्य तपासणी शिबिराचा ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.

## जनतेच्या कल्याणासाठी निधी खेचून आणू-आ.विनोद अग्रवाल

**गोंदिया:** काही लोकप्रतिनिधी आपण केलेल्या कामाचे श्रेय घेण्यासाठी जनतेची ते दिशाभूल करण्याचे काम करतात, अशा लोकांपासूनस जनतेने सावध राहावे, विकासकामांचे श्रेय घेऊन नव्हे तर जनतेच्या हृदयात स्थान निर्माण करण्याकरीता विकासकार्य करायचे असते, क्षेत्राचा विकास हिच आपली प्राथमिकता असून जनतेच्या कल्यासाठी पाहिजे तेवढा निधी शासनाकडून खेचून आणू, अशी ग्वाही आमदार विनोद अग्रवाल यांनी दिली.




ते विधानसभा क्षेत्रातील विविध गावांमध्ये मंजूर रस्ता बांधकामांच्या भूमिपूजनप्रसंगी बोलत होते. पुढे अग्रवाल म्हणाले, अनेक गरजूंना रेशन मिळू लागले, पूरपूग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी २७ हजार आर्थिक मदत करण्याचा निर्णय ही आमल्या पाठपुराव्यामुळे झाल्याचे त्यांनी सांगीतले. आभासी ७/१२, सिटी सर्व्हे, घरकुल योजनेचा लाभ, कृषी गोदाम, महिला बचत इमारत, वाचनकक्ष, आमदार क्रीडा महोत्सव आदी उपक्रमाची सुरुवात क्षेत्रात झाली असून त्याचा लाभ जनेतेला होत असल्याचे अग्रवाल यांनी सांगीतले. तळागाळातील लोकांना न्याय देण्याचे आपले कर्तव्य आहे.

काही माजी लोकप्रतिनिधी २७ वर्षांच्या कामांची तुलना आपल्या अडीच वर्षाच्या कार्यकाळाशी करत असून जे काम २७ वर्षात होऊ शकले नाहीत ते आपण आपल्या आतापर्यंतच्या कार्यकाळात पुर्ण केल्याचे सांगत सिंचन, पिण्याचे पाणी, पक्के रस्ते, नागरी सुविधा उपलब्धतेवर आपला भर असल्याचेही ते म्हणाले. यावेळी गर्रा बु,कोचेवाही, धामनगाव, बाजारटोला, कासा/ब्राम्हणटोला, मरारटोला (काटी), डांगोरली येथे सिमेंट रस्ता बांधकामांचे भूमिपूजन आ. अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात

कार्यक्रमाला पं.स.सभापती मुनेश रहांगडाले, जि.प. सदस्या नेहा तुरकर, भाऊराव उके, छत्रपाल तुरकर, पं.स. सदस्या जितेश्वरी रहांगडाले, मंजू डोंगरे, सुनीता दिहारी, पं.स. सदस्य शिवलाल जमरे, राजेश जमरे यांच्यासह बहुसंख्येने पदाधिकार, ग्रामस्थ उपस्थित होते.

## पक्ष बळकटीसाठी युवकांनी पुढाकार घ्यावा-महेबूब शेख



**गोंदिया:** आगामीकाळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका आहेत. या निवडणुकांमध्ये तरुणानना संधी देवून अधिक ताकदीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडूक लढविणार आहे. म्हणून युवकांनी संधीचे सोने करुन घेण्यासाठी पक्ष बळकटीच्या कामाला लागावे, असे आवाहन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने शरद युवा संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले. ही यात्रा ३० सप्टेंबर रोजी गोंदियात दाखल झाली. या निमित्त आयोजित युवकांच्या मेळाव्याला संबोधित करताना ते बोलत होते.

मेहबूब शेख पुढे म्हणाले, खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या प्रयत्नाने गोंदिया, भंडारा या दोन्ही जिल्ह्यात बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळविण्यासाठी मोठे प्रकल्प उभारण्याचे काम करण्यात आले. अदानी विद्युत प्रकल्प, बिरसी विमानतळ हे त्याचे फलित आहेत. त्याचप्रमाणे भेल या प्रकल्प उभारणीचे कामही सुरु करण्यात आले होते. मात्र नाकर्ते मोदी सरकारने ते प्रकल्प थंडबस्त्यात ठेवले आहे. शिवाय या दोन्ही जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी खासदार प्रफुल्ल पटेल हे सतत प्रयत्नत राहतात. खासदार पटेल सारखे कणखर नेतृत्व गोंदिया, भंडारा जिल्ह्याला मिळाले, हे सौभाग्यच आहे. या यात्रेच्या माध्यमातून पक्षाला नवउभारी देण्याचे काम राष्ट्रवादी युवक काँग्रेस करीत आहे. म्हणून युवकांनी पक्ष बळकटीसाठी कामाला लागावे, असेही आवाहन त्यांनी केले.

यावेळी मंचावर माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, युवक कार्याध्यक्ष नितीन भटाळकर, केतन तुरकर, सौरभ मिश्रा आदी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी जैन यांनी राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. या पक्षात कसलाही भेदभाव न बाळगता कार्यकर्त्यांना महत्व दिले जाते. म्हणून कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुकीसाठी कामाला लागावे, असे आवाहन केले. या मेळाव्यात गोंदिया जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**शरद युवा यात्रेनिमित्त आयोजित युवक काँग्रेसच्या मेळाव्यात खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्व व पक्ष विचार धारेवर विश्वास करुन कटंगीकला, नवेगाव येथील अनेक कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. यामध्ये अखिल सिंग, निलेश उके, देवेंद्र बोपचे, खेमेंद्र ठाकुर, प्रदीप चौधरी, विवेक बिसेन, शक्ती कटरे, राजकुमार कुंजाम, मितराम भगत, राकेश रिनाईत, नाशीर शेख, शंकर प्रजापती, विजय लांजेवार, देवेंद्र ठाकुर, ऋतिक बावनथडे आदिंचा समावेश आहे.**

## ट्रॅक्टर आणि दुचाकीच्या अपघाताच एकाचा मृत्यू

**चिचगड.:** चिचगड पोलीस ठाणेंतर्गत येत असलेल्या पिपरखाली येथे सोमवारच्या(दि.३)रात्री आठ वाजेच्या सुमारास ट्रॅक्टर आणि दुचाकीमध्ये आमोरा समोर झालेल्या धडकेत एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली.मृतकाचे नाव प्रल्हाद देवाची टेंभुर्णे (वय २०,राहणार हालम कुडो,तालुका चौकी(बाधां) जिल्हा राजनांदगाव) असे आहे.तर मृतकाच्या दुचीकावर मागे बसलेला किशोर कुंभरे राहणार सुंदरीदंड तालुका देवरी हा गंभीर जखमी झाल्याने त्यास गोंदियाच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे.ट्रॅक्टर क्रमांक च क-३५ अट-१३८४ व मोटर सायकल क्रमांक,उत्र ०७-अठ - १७५१ गे दोन्ही वाहन पोलीस स्टेशन चिचगडला जमा करण्यात आले असून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.या प्रकरणाचा तपास पीएसआय मनोहर इस्कापे करीत आहेत.

## काळ्या धनाच्या नावावर महिलेची लुट,३ आरोपी ताब्यात

**देवरी :-** तालुक्यातील सालई (फुटाना) गावातील खेलनबाई मधुकर सलामे यांचा घरात काळा धन असल्याचे सांगत साकोली तालुक्यातील सानगडी येथील तिघांनी ८५ हजारांनी फसवणूक केल्याचे समोर आले आहे. यामध्ये सुरेश नारायण गिरी (५१), अरविंद सुरेश गिरी (२२), रामदास शंकर पुरी (५८), तिन्ही राहणार सांनगडी ता.साकोली, जि. भंडारा यांचा समावेश आहे. सदर घटनेची तक्रार महिलेनी देवरी पोलीस स्टेशनला केली असता पोलीस निरीक्षक रेवचंद सिगंनजुडे यानीं चक्रे फिरवत तिन्ही आरोपीनां सौदंड येथून ताब्यात घेतले आहे.



सविस्तर असे की, खेलनबाई सलामेची प्रकृती बरी राहत नसल्याने सुरेश नारायण गिरी (५१),अरविंद सुरेश गिरी (२२), रामदास शंकर पुरी (५८) या आरोपींनी खेलनबाईस तुझी प्रकृती दुरुस्त करुन देतो असे बोलुन तिच्या घरी येऊन पुजापाठच्या नावावर पैसे घेतले. नंतर तिंन्ही आरोपीनी तुझे घरी गुप्तधन आहे तो काढावा लागेल नाही तर घरातील एका व्यक्तीचा जिव जाईल अशी भिती दाखवुन अंधश्रध्देचे नावाखाली संगणमत करुन खेलनबाईची दिशाभुल केली. तोपर्यंत नगदी ८५,०००/रु. घेवून फसवणुक केली होती. यात दोन ते चार वेळा साकोली येथे पैसे घेवून खेलनबाईला बोलावले होते. त्यातच परत २८ सप्टेंबर २०२२ रोजी खेलनबाईला तिघांनी पैशाची मागणी केली. त्यावर खेलनबाईने ही संपुर्ण घटना देवरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यानां सांगितले. त्यावर मला रुपये १२,००० घेवून साकोली येथे बोलावल्याचे सांगतिले. त्यावर सिंगनजुडे यानीं सापळा रचत सपोनि घाडगे व पोलीस स्टाफ यांना खेलनबाईसह रवाना केले.

आरोपी सुरेश नारायण गिरी,अरविंद सुरेश गिरी यांना खेलनबाईने श्रीरामनगर सौंदड येथे पैसे घेण्यासाठी बोलाविले असता ते दोन्ही आरोपी सौंदड येथे फिर्यादीकडून पैसे घेताना रंगेहाथ पकडण्यात आले.तर तिसऱ्या आरोपीला देवरी पोलिसानीं २९ सप्टेंबरला ताब्यात घेतले.तिन्ही आरोपीवर २८९/२०२२ कलम ४२०, ५०८, ३४ भादंवि सह कलम ३ महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंध अधिनियम २०१३ अतंर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## जि.प.उपाध्यक्षांच्या अकस्मात भेटीत घोनाडी आरोग्य केंद्राचा अनागोंदी कारभार उघडकीस




**चिचगड:** जिल्ह्यातील घोनाडी प्राथमिक आरोग्य केंद्राला आज रविवारला जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व आरोग्य सभापती इंजि.यशवंत गणवीर यांनी दिलेल्या आकस्मिक भेटीत केंद्रातील अनागोंदी कारभार उघडकीस आला. जि.प.आरोग्य सभापतींच्या भेटीदरम्यान आरोग्य केंद्रात एकही कर्मचारी उपस्थित नसल्याचे बघावयास मिळाले.

विशेष म्हणजे आरोग्य केंद्र व औषधभांडार कक्षाचे दार खुले करुन सर्व कर्मचारी बेपत्ता असल्याचे निदर्शनास आले. उपाध्यक्ष व आरोग्य सभापती केंद्रात आल्याचे कळताच काही वेळानंतर एल.एच.व्ही. कु.सहाळा, वाहन चालक बोपचे पोचले. त्यांना विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही.

औषध भांडारातून एखाद्या व्यक्तीने कुठलीही औषध नेऊन सेवन केल्याने कमी जास्त झाल्यास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित करीत संबधित बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा आरोग्य अधिकारी यांना उपाध्यक्ष इंजि.गणवीर यांनी त्वरीत भ्रमणध्वनी करुन दिले.

## स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तात्काळ शासनाकडे सादर करा-आ.रहांगडाले



**तिरोडा:-** महाराष्ट्रात शिंदे फडणवीस सरकार स्थापन होताच तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार यांनी विकासकामांवर भर देत गोरेगाव येथे स्वतंत्र पाणीपुरवठा योजना सुरु करण्याकरिता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे मागणी केली असता विभागाला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले.

सदर योजना तातडीने सुरु करण्यासाठी तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी जिल्हाधीकारीच्या दालनात बैठक बोलाविली. यामध्ये प्रामुख्याने नगर परिषद तिरोडा येथील म.फुले वार्ड येथील अतिक्रमण धारकांना पट्टे वाटप करणे, नगर पंचायत गोरेगाव येथील शास्कीय जागेवर अतिक्रमण धारकांना पट्टे वाटप करणे,श्रीरामपूर पुनर्वसन येथील पट्टे नियमाकुल करणे, नगर पंचायत गोरेगाव येथे पाणीपुरवठा योजनेचे DPR तयार करणे, अनु.जाती व अन्य परंपरागत वननिवासीधारकांना वनहक्क दावे मंजूर करणे, निमगाव आंबेनाला प्रकल्पाचे काम सुरु करण्यासाठी Catchment Treatment Plant तयार करून सुप्रमाकरिता सादर करणे आदी महत्वपूर्ण विषयावर आढावा घेण्यात आले. या बैठकीमध्ये प्रामुख्याने जिल्हाधिकारी नयना गुंडे, उपवनसंरक्षक कुलराजसिंग, मजीप्राचे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठाचे कार्यकारी अभियंता, तिरोडा व गोरेगावचे तहसीलदार, माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार उपस्थित होते.

## भटक्या जमातीच्या लोकांना आजही पिण्याचे पाणी देण्यास नकार



**सडक अर्जुनी:** तालुक्यातील सिंदीबिरी गटग्रामपंचायत अंतर्गत ग्राम बिरी येथे भटक्या जमातीच्या लोकांचे वास्तव्य आहे. बिरी येथील पाणी पुरवठा योजनेंतर्गत नळाचे पाणी मागिल सात दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे येथील नागरिकांना बोअरवेलचे दुषित पाणी प्यावे लागत आहे.

ग्रामपंचायत प्रशासन व पाणीपुरवठा विभागाचे दुर्लक्षामुळे जलजीवन व शुध्द पाणी पुरवठा योजना ही नागरिकांना शुद्ध पाण्यापासून वंचित ठेवित आहे. ग्रामपंचायत पदाधिकारी सांगतात की, नागरिकांनी घर टॅक्स न भरल्याने सदर योजना बंद केली आहे.वास्तविक कोविड-१९ कोरोना काळात लोकांना स्वतःचे घर सांभाळणे कठीण झाले होते. त्यामुळे घर टॅक्स भरू शकले नाही. बिरी येथे भटक्या जमातीचे २० घरांचे कुटुंब असून त्यांची परिस्थिती हलाखीची आहे. इतर सधन लोकांसारखे घरी विहीर किंवा बोअरवेल खोदू शकत नाही. त्यामुळे दुषित पाण्याचा वापर करीत आहेत. गावातील सधन लोकांकडे बोअरवेल असून या भटक्या जमातीच्या लोकांना पाणी भरू देत नाही. आजही भटक्या जमातीच्या लोकांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही.

## बोरगाव बाजार येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक निलंबित

**देवरी:** देवरी येथील आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यलयांतर्गत येणाऱ्या बोरगाव बाजार येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील पाचव्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थाला जबर मारहाण केल्याप्रकरणी एका शिक्षकाला प्रकल्प अधिकारी यांनी तत्काल निलंबित केले आहे.

देवरी तालुक्यातील बोरगाव बा. येथे आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रम शाळा सुरू आहे. या आश्रमशाळेत इयत्ता पाचवी मध्ये शिकत असलेल्या अक्षय पंधरे या विद्यार्थ्याला श्री. ठेंगरे या शिक्षकाने जबर मारहाण केली. या मारहाणीमुळे अक्षयच्या डोक्याला जखम झाली. अक्षयच्या पालकांना ही बाब कळल्यावर त्यांनी देवरीच्या प्रकल्प अधिकाऱ्यांकडे या प्रकरणी तक्रार केली.

प्राप्त तक्रारीच्या आधारे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी प्रकरणाची चौकशी करून अक्षयला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. चौकशीमध्ये श्री ठेंगरे दोषी आढळल्याने प्रकल्प अधिकारी यांनी त्यांना तत्काल निलंबित केले. उल्लेखनीय म्हणजे संबंधित शिक्षकाला या अगोदर सुद्धा अनेक प्रकरणात कारणे दाखवा नोटीस बजावल्याची माहिती आहे.

# सरकारीच्या पाण्यात उतराल तर अंगाला सुटेल खाज!

**गोंदिया:** प्रत्येक शहराचे वैशिष्टय असते. गोंदिया शहरातील तलाव हेही या शहराचे वैशिष्टय आहे. ते नुसते तलाव नसून ऐतिहासीक वारसा त्यांना लाभलेला आहे. सरकारी तलाव हा त्यातीलच एक तलाव होय. रेल्वे स्थानकालगत असलेला हा तलाव शहरासाठी संजीवनीपेक्षा कमी नाही. मात्र, तलावासाठी कुणीही काहीच केले नाही व परिणामी सरकारी तलाव आता घाणीच्या विळख्यात अडकून आहे. या तलावात आता परिसरातील घाण पाणी जात असल्याने तलाव दूषित झाला आहे.



सर्वत्र असलेल्या कचऱ्यामुळे सौंदर्यही नष्ट झाले आहे. त्यामुळे हा ऐतिहासीक वारसा अस्तित्वाची लढाई लढत आहे. तलावाची स्थिती अतिशय वाईट आहे. हे तलाव स्वच्छ करणे व खोदकाम करुन खोली वाढविणे आवश्यक आहे. असे झाल्यास सरकारी तलाव गोंदिया शहराची शान वाढविणारी आणखी वस्तू होणार यात शंका नाही. मात्र यासाठी लोकप्रतिनिधीसोबतच प्रशासनानेही गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. अन्यथा सरकारी तलावाच्या स्वरूपात असलेली ही दोन अतिक्रमण व घाणीच्या विळख्यात संपूण जाईल.

तलावाच्या वाढलेल्या घातक वनस्पती व घाण पाण्यामुळे तलावाच्या बाजूने जातानाही नाक बंद करावे लागते. तलावाचे सौंदर्यीकरण करणे गरजेचे आहे. असे झाल्यास परिसरातील नागरिकांना फिरण्यासाठी एक चांगली जागा मिळणार. शिवाय जमिनीतील पाण्यासाठी एक चांगले स्त्रोत उपलब्ध होणार.

### सरकारी तलावची झाटी गटारगंगा

**ड्रेनेजचे पाणी तळ्यात:** सरकारी तलावालगत सिंधी कॉलनी तसेच झोपडपट्टी लागून आहे. वस्तीतल्या सर्व घरातील ड्रेनेजचे पाणी तलावातच जात असते. त्यामुळे तलावात आता पाणी नव्हे तर घाण साचलेली आहे.

**अतिक्रमणाचा धोका:** सरकारी तलावालगत वस्ती असल्याने सरकारी तलावाचा प्रश्न मार्गी काढणे गरजेचे आहे. अन्यथा अतिक्रमणाचा धोका टाळात येणार नाही.

**प्लास्टिक कचरा ताब्यात:** तलावालगत राहणाऱ्यांच्या घरातील कचराही तलावातच जाताना दिसतो. त्यामुळे तलावाला कचऱ्याचा विळखा लागला आहे.

### प्रदुषित पाण्यामुळे आजार

तलावात स्वच्छ पाणी नाही तर ड्रेनेजचेच पाणी साचलेले आहे. त्यामुळे प्रदुषणाच्याही पलीकडे गेले आहे. आजघडीला तलावालगत रस्त्याने गेले तरीही दुर्गंध येतो. अशा पाण्यात शिरल्यास अनेक आजार जडण्याची शक्यता आहे.

### जवाबदारी कोणाणी?

तलाव सुंदर आणि सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी नगरपालिकेची आहे. मात्र, प्रशासन याकडे फारसे गांभीर्याने लक्ष देत नाही. एखाद्या लोकप्रतिनिधीने लक्ष दिले तरी अंमलबजावणी योग्यप्रमाणे होत नाही. नागरिकांकडूनही बेजबाबदारपणे तलावाची कचराकुंडी केली जात आहे. त्यात रेल्वे विभागाचीही आडकाळी आहे.

### शहरात तलाव राहिले कुठे?

शहरात आता चार प्रमुख राहिले आहे. त्यातील सिव्हील लाईन तलावचे सौंदर्यीकरण झाले आहे. छोटा गोंदिया, सूर्याटोला येथील तलावाचा विषय बाकी आहे. तर सरकारी तलाव सर्वात मोठा तलाव असून याचा विषय लवकरात लवकर मार्गी लावण्याची गरज आहे.

### उपाययोजा कागदावच

सरकारी तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी प्रभागातील नगरसेवकांकडून प्रयत्न करण्यात आले. मात्र रेल्वेचा विषय येत असल्याने सहजासहजी काहीच होत नाही. परिणामी सरकारी तलावाचा विषय रेंगाळत चालला असून उपाययोजना फक्त कागदावरच राहत गेल्या आहेत.

# महिलांकरिता कायदेविषयक जनजागृती मार्गदर्शन शिविर

**अर्जुनी मोरगाव:** संपूर्ण राज्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर सेवा पंधरवाडा कर्तव्यपथ म्हणून राबविण्यात येत आहे. त्याच पार्श्वभुमीवर समाज कल्याण आयुक्त प्रशांत नारनवरे यांच्या अभिनव संकल्पनेतून तसेच सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे यांच्या मार्गदर्शनानुसार सेवा पंधरवाडा कर्तव्यपथ अभियान अंतर्गत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह (नवीन) अर्जुनी मोरगाव येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. सेवा पंधरवाड्याचे औचित्य साधून महिला सबलीकरण या संकल्पनेच्या अनुषगाने २९ सप्टेंबर रोजी वसतीगृहात महिलांकरिता कायदेविषयक जनजागृती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. पोमेश रामटेके, डॉ.प्रा.कल्पना सांगोळे उपस्थित होते.



कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. पोमेश रामटेके यांनी विद्यार्थिनींना संविधानातील महिला विषयक कायदे व कलम काय आहेत याबाबत मार्गदर्शन करुन किशोर वयातील येणारे बदल व समाजातील दुर्बल घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महिलांनी आपला विकास साधावा असे प्रतिपादन ॲड.पोमेश रामटेके यांनी केले. तसेच डॉ.प्रा.कल्पना सांगोळे यांनी स्त्रीयांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याची माहिती दिली आणि विद्यर्थिनींना मनातील न्युनगंड बाजूला सारुन अधिक आत्मविश्वासाने वाटचाल करावी असे मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गृहपाल साधना यावलकर होत्या. संचालन श्रेया लोणारे यांनी केले. आभार प्रणाली नेवारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरिता वसतीगृहातील कर्मचारी व विद्यर्थिनींनी सहकार्य केले.

# जिल्हा परिषद अध्यक्षपदी पुन्हा मिळणार ओबीसींना संधी

**गोंदिया :** राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणाची यादी शासनाने ३० सप्टेंबर रोजी जाहीर केली. यात गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद पुढील अडीच वर्षांकरिता ओबीसींसाठी राखीव झाले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्षपदी पुन्हा ओबीसींना संधी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्याच्या ग्रामविकास विभागाने ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांचे आरक्षण ३० सप्टेंबरला जाहीर केले आहे. हे आरक्षण ज्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत, त्यांच्यासाठी व ज्या ठिकाणी झाल्या आहेत त्या ठिकाणी पुढील अडीच वर्षांनंतर लागू होणार आहे. यात गोंदिया जि. प.चे अध्यक्षपद हे पुढील अडीच वर्षांकरिता ओबीसींसाठी राखीव असणार आहे. गोंदिया जिल्हा परिषदेची निवडणूक कोरोनामुळे दोन वर्षे लांबणीवर गेली होती.



### जिल्हा परिषदेचे आजवरचे अध्यक्ष

के. आर. शेंडे, प्रल्हाद भोयर, रजनी नागपुरे, चंद्रशेखर शे ठवरे, नेतराम कटरे, विजय शिवणकर, उषा मेंढे, सीमा मडावी, पंकज रहांगडाले–विद्यमान

### अध्यक्षपदासाठी पुन्हा होणार चुरस

गोंदिया जिल्हा परिषदेत भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अभद्र युतीची सत्ता आहे. अध्यक्षपद भाजपकडे तर उपाध्यक्षपद हे राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. जिल्हा परिषदेत भाजपचे संख्याबळ अधिक असल्याने पुढील अडीच वर्षांनंतर अध्यक्षपदी भाजपच्या सदस्याची वणी लागणार हे स्पष्ट आहे. त्यातच पुढील अडीच वर्षांकरिता अध्यक्षपद हे ओबीसींसाठी राखीव असल्याने यासाठी भाजपच्या सदस्यांमध्ये चुरस होण्याची शक्यता आहे.

### आरक्षणावर घेतला जाऊ शकतो आक्षेप

जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद हे सलग दुसऱ्यांदा ओबीसींसाठी आरक्षित झाले आहे. तर जिल्हा परिषदेच्या आजवर अध्यक्षपदाच्या आरक्षणावर नजर टाकली असता ओबीसी, जनरल यांना संधी मिळाली आहे. पण अनुसूचित जाती प्रवर्गाला अद्यापही संधी मिळालेली नाही. त्यामुळे ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या आरक्षणावर काही जण आक्षेप घेण्याची शक्यता आहे.

कोरोना प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर डिसेंबर २०२१ आणि जानेवारी २०२२ अशी दोन टप्प्यात निवडणूक घेण्यात आली, तर अध्यक्षपदाची निवडणूक जून महिन्यात घेण्यात आली. तेव्हा अध्यक्षपदाचे आरक्षण ओबीसीच निघाले होते. ते त्यामुळे ओबीसी चेहऱ्याला संधी मिळाली. जि. प. अध्यक्ष आणि सभापतींचा कार्यकाळ हा अडीच–अडीच वर्षांचा राहतो. त्यामुळे अडीच वर्षांनंतर अध्यक्षपदी कोणत्या प्रवर्गाला संधी मिळते हे आरक्षण जाहीर झाल्यानंतर कळते. ते पण यंदा मात्र हे आधीच स्पष्ट झाले आहे.

ग्रामविकास विभागाने ३० सप्टेंबरला काढलेल्या पत्रानुसार जि. प. अध्यक्षपद हे पुढील अडीच वर्षांकरिता पुन्हा ओबीसींसाठी आरक्षित झाले आहे. त्यामुळे जि.प.अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा ओबीसींना संधी मिळणार आहे.

# "माता सुरक्षित तर घर सुरक्षित", ६२१७ गरोदर महिलांची आरोग्य तपासणी

**गोंदिया:–** "माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या अभियानांतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत २९ हजार ५३३ महिलांची तर ६ हजार २१७ गरोदर महिलांची आरोग्य बाबतच्या विविध तपासणी करण्यात आल्या. त्यामध्ये आढळलेल्या आजारांबाबत समुपदेशन करुन पुढील उपचार व मार्गदर्शनश करण्यात येत आहे.

महिलांची आरोग्य तपासणी, समुपदेशन, जनजागृती आणि आवश्यकता असल्यास उपचार अशा चार भागात हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात महिला, गरोदर स्त्रिया व किशोरवयींन यांना प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सुरक्षित आणि सुदृढ आरोग्यासाठी समुपदेशनाच्या माध्यमातून भविष्यात महिलांचे आरोग्य उत्तम राहण्यास निश्चितच मदत होणार आहे. वैद्यकीय अधिकारी आणि स्त्रीरोग तज्ज्ञांमार्फत १८ वर्षांवरील महिला, नवविवाहित, गरोदर माता, किशोरवयींन यांची तपासणी, औषधोपचार, सोनोग्राफी आणि समुपदेशन करण्यासाठी शिबिरे आयोजित केली जात आहेत. ३० वर्षावरील महिलांची



कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतिबिंदू, दूकान, नाक व घसा तसेच इतर आजारांचे निदान व आवश्यकतेनुसार उपचार करण्यात येत आहेत.

आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी या गावोगावी महिलांना तपासणीसाठी प्रोत्साहित करुन वैद्यकीय अधिकारी व सामुदायिक आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत आरोग्य संस्थेत ३० वर्षांवरील सर्व महिलांची तपासणी व गंभीर रुग्णांना संदर्भ सेवा देत आहे. आतापर्यंत असांसर्गिक कार्यक्रमतर्गत १८२७६ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून रक्तातील साखरेची पातळी, लिपिड प्रोफाईल ,केफटी, एलफटी, थायरॉईड आदींची प्रयोगशाळा तपासणी करण्यात येत आहे.

आतापर्यंत तपासणी करण्यात आलेल्या महिलांमध्ये ६९६ महिलांना मधुमेह, १६४० महिलांना उच्च रक्तदाब, गरोदर महिलांपैकी २५७ महिलांना उच्च रक्तदाब, २८३ महिलांना मधुमेह, १७४ महिलांना हायपोथायरॉईड आढळला आहे. ३९७ मातांची सोनोग्राफी करण्यात आली असून ८७३६ जणांना मानसिक आरोग्य तंबाखू याबाबत समुपदेशन करण्यात आले. ६० वर्षावरील ११७० महिलांची नेत्र तपासणी करण्यात आली. तर ६० वर्षावरील २१४४ महिलांची कान, नाक, घसा तपासणी करण्यात आली. आरबीएस पथकाने ८६ शाळेतील ३०१४ मुलांची आरोग्य तपासणी केली. गर्भधारणापूर्व सेवा कार्यक्रमाअंतर्गतग ११७३ समुपमुदेशन शिबीराद्वारे ७००२ लाभार्थ्यांना सेवा देण्यात आल्याचे जिपचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांनी सांगितले.

# गाडगेबाबांची दशसूत्री तत्काळ लावा–विविध संघटनांचा आक्रोश

**यवतमाळ:–** राज्य सरकारने मंत्रालयाच्या दर्शनी भागावर लावण्यात आलेली गाडगेबाबांचे तैलचित्र आणि दशसूत्री काढल्याच्या निषेधार्थ यवतमाळातील विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत तीव्र आंदोलनाचा इशारा (दि.०३) निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे .

भारतीय पिछडा ओबीसी शोषित संघटन नई दिल्ली, ओबीसी जन मोर्चा, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, संभाजी ब्रिगेड, सावित्रीबाई फुले महिला मंडळ व विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देत आपल्या तीव्र भावना राज्य सरकारला कळविण्याची विनंती केली.

याप्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर गोरे, विलास काळे, संतोष झेंडे, रमेश गिरोळकर, ज्ञानेश्वर रायमल, अशोक मोहुर्ले, प्रा. सविता हजारे, शशिकांत फेंडर, राहुल सारवे, सचिन साखरकर, माधवी चिंचोळकर, सुरज खोब्रागडे, अजय ढोबे, दीपक काळे, बबनराव सुखसोहळे, राम घोटेकर, मृणाल बिहाडे, श्रीकांत निवल आदि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



### शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी मतदार नोंदणी सुरु

**गडचिरोली:** भारत निवडणूक आयोगाने दिनांक १४ जूलै,२०२२ च्या पत्रान्वये दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत नागपूर विभागातील शिक्षक मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करावयाचा पुनरिक्षण कार्यक्रम घोषित केला आहे.नागपूर विभागातील शिक्षक मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत, आपले नाव शिक्षक मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यायासाठी दिनांक ०१ ऑक्टोंबर, २०२२ पासुन अर्ज स्विकारणे सुरु होणार आहे. माहिती भरुन संबंधीत उपविभागीय अधिकारी/तहसिल कार्यालय मध्ये अर्ज सादर करावे, असे उप जिल्हा निवडणूक अधिकारी,गडचिरोली, समाधान शेंडगे यांनी कळविले आहे.

# धान खरेदी केंद्राचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना-देवेंद्र फडणवीस




**भंडारा :** जिल्हा नियोजन समितीतर्फे यंत्रणांना निधी वितरण करण्यात आले असून विकासकामांच्या प्राधान्यक्रमानुसार विभागांनी निधी वेळेत खर्च करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते.यावेळी त्यांनी सन २०२०–२१ व सन २०२१–२२ मधील झालेल्या कामांचा व खर्चाचा आढावा घेतला. तसेच २०२२–२३ मधे प्रस्तावित कामांची माहिती घेतली. या बैठकीला खासदार सुनिल मेंढे, जिल्हा परिषद अध्यक्ष गंगाधर जिभकाटे, विधान परिषद सदस्य परिणय फुके, आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार नाना पटोले, आमदार राजू कारेमोरे, जिल्हाधिकारी संदीप कदम, पोलीस अधीक्षक लोहित मतानी, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय मुन व विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

धान खरेदी प्रक्रिया अधिक पारदर्शक होण्यासाठी धान खरेदी केंद्राचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येत असून योग्य संस्थाना धान खरेदीचे काम देण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले. धान खरेदीबाबत प्राप्त तक्रारींची चौकशी करुन त्यात अपहार आढळल्यास दोषींवर फौजदारी कारवाई करण्यात येईल. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मंत्रिमंडळ उपसमितीचे गठण करण्यात आले असून त्या समितीच्या शिफारशीनुसार शेतकऱ्यांना तात्काळ मदत केल्या जाईल, असे श्री.फडणवीस यांनी सांगितले.

धान खरेदीबाबत पारदर्शक पध्दतीने प्रक्रिया करण्यात यावी. तसेच सॅटेलाईट मॅपीग व रिमोट सेन्सींगव्दारे धान उत्पादक क्षेत्राची माहिती कृषी विभागाने घेवून त्याव्दारे उत्पादनाचा अंदाज घ्यावा. यामुळे परराज्यातील धान स्थानिक खरेदी केंद्रावर येत असल्यास त्याला आळा बसेल. तसेच धान खरेदी संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी या विषयाचे गांभीय लक्षात घ्यावे, कर्तव्यात कसूर झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

### मत्स्यबीज उत्पादनासाठी विस्तृत आराखडा सादर करा

जिल्ह्यात १४० मत्स्यव्यवसायांशी संबंधित संस्था असून १४ हजारावरुन अधिक लोक या संस्थाशी जुळलेले आहेत. तलावांचा संख्या जास्त असल्याने पशुविज्ञान व मत्स्य विद्यापीठ, नागपूर यांच्या सहाय्याने मत्स्यबीज उत्पादनासाठी मत्स्य संस्थाना प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विस्तृत आराखडा तयार करुन तो शासनास सादर करावा. त्यास निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच जिल्यास्च्या विकासकामांचे प्राधान्यक्रम ठरवून कामे करावीत. विकास कामांचा दर्जा चांगला व गुणवत्तापूर्ण असावा, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हा नियोजन समितीतर्फे यंत्रणांना ९५ टक्के निधीचे वितरण झाले असून त्या तुलनेत खर्च कमी झाला आहे. पुढील तीन महिन्यात निधी खर्चाचे नियोजन करण्यात यावे, असेही निर्देश श्री. फडणवीस यांनी दिले.

शेतकऱ्यांना बारा तास वीज उपलब्ध होण्यासाठी कृषी फीडर सौर उर्जेवर करण्याची योजना शासन आणणार आहे. सोलर सयंत्र बसवून कृषी फीडर लोड शेडींगमुक्त करण्यासाठी योजना येणार आहे. यात काही शेतजमीन लागणार असून ही जमीन भाडे तत्त्वावर घेण्यात येणार आहे. यासाठी पीक उत्पादनापेक्षा जास्त रक्कम भाडे स्वरूपात शेतकऱ्यांना दिली जाणार आहे. तसेच कुसुम योजनेतून २ लाख कृषी पंप देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील रिक्त पद भरतीबाबत निर्देश दिले असुन विदर्भ–मराठवाडा भागात मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे आहे. म्हणून बदल्यांची चक्राकार पध्दत पुन्हा सुरू करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

घरकुलांकरीता केलेल्या अतिक्रमणांना नियमीत करण्यासंबंधी शासन निर्णय जारी करण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावाही त्यांनी यावेळी घेतला. जिल्यायात ५४ हजार मंजूर घरकुल असून त्यापैकी ४२ हजार घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत घरकुलांचे काम कालमर्यादेत करण्याचे निर्देश श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

### ८५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम वर्ग

पुरपरिस्थीतीमुळे नुकसान भरपाई म्हणून ६३ कोटी रूपयांचे अनुदान जिल्ह्याला प्राप्त झाले. त्यापैकी शेतीचे नुकसान झालेल्या ८५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम वर्ग करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी संदीप कदम यांनी यावेळी दिली.

### शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी नोंदणी करावी

**भंडारा,:** नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२३ साठी एक आक्टोंबर पासून मतदार नोंदणी प्रक्रीया सुरू झाली असून पात्र शिक्षकांनी निवडणूक आयोगाने जारी केलेला फार्म १९ भरून मतदार व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संदीप कदम यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहामध्ये आज झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. १ ऑक्टोबर २०२२ पासून मतदार नोंदणी अधिनियम १९७० च्या कलम ३१ ( ३ ) अन्वये जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. सोबतच नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२३ साठी निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

२५ ऑक्टोबरला दुसरी व अंतीम सूचना प्रसारित झाल्यानंतर ७ नोव्हेंबरपर्यत दावे व हरकती स्वीकारण्याचा अंतिम दिनांक आहे. प्रारूप मतदार यादी २३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# बालेवाडी, पुणे येथे ६ ऑक्टोबरला "नैसर्गिक शेती" कार्यशाळा

**वाशिम:–** कृषी विभागामार्फत ६ ऑक्टोबर रोजी बालेवाडी, क्रीडा संकुल, पुणे येथे "नैसर्गिक शेती" कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेला गुजरातचे राज्यपाल श्री.आचार्य देवव्रत हे मार्गदर्शन करणार आहे. या कार्यशाळेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री अब्दुल सत्तार, फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी नैसर्गिक शेतीला देशात प्रोत्साहन देणे, रासायनिक खतांच्या मुख्यतः युरीयाचा वापर कमी करणे यावर भर देण्याचे निर्देश दिलेले आहे. या दृष्टीने गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी कुरुक्षेत्र हरियाणा येथे केलेले नैसर्गिक शेतीचे प्रयोग आणि प्रसार याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. कुरुक्षेत्र येथील गुरुकुलाची सुमारे २०० एकर शेती पुर्णतः नैसर्गिक शेतीमध्ये कशी परीवर्तीत केली आणि भविष्यात हा शाश्वत शेतीचा पर्याय कसा होऊ शकतो याबद्दल त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

राज्यभरातून सुमारे २ हजार शेतकरी या कार्यशाळेस उपस्थित राहतील. दुपारच्या तांत्रिक सत्रात तज्ञांचे मार्गदर्शन तसेच महाराष्ट्रात नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे अनुभव कथन ऐकायला मिळणार आहे. या कार्यशाळेला जोडून नैसर्गिक शेतीबाबतच्या एका प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचे थेट प्रक्षेपण कृषी विभागाच्या युट्युब चॅनलवर https://www.youtube.com/c/AgricultureDepartmentGoM करण्यात येणार आहे. तसेच सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणाची व्यवस्था ग्राम पंचायत कार्यालय, शासकीय कार्यालये, कृषि विज्ञान केंद्र, कृषि संशोधन संस्था इ. ठिकाणी करण्यात येणार आहे.

अन्नधान्याच्या आणि संकरित वाणाच्या तसेच इतर पिकांच्या अधिक उत्पादनासाठी रासायनिक खते, किटकनाशके, बुरशीनाशके आणि तणनाशकाचा मोठ्या प्रमाणात असंतुलित व अमर्याद वापर होत असुन पाण्याचा जास्त वापर, जमिनीची धुप होणे, सेंद्रिय खतांचा कमी वापर अथवा अजिबात वापर न करणे, एकच पीक वारंवार घेणे इत्यादी कारणांमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडून जमिनीतील जैविक घटकाचा विनाश झाल्याने जमिनी मृत होत चालल्या असून कडक होत आहेत. तरी या कार्यशाळेच्या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# अन्यथा पुढील वर्षी आरटीई प्रवेश बंद! आरटीई फाऊंडेशनडेचा निर्णय

**गोंदिया:** शिक्षणाचा अधिकार अंतर्गत गरीब विद्यार्थ्यांना कॉन्व्हेंटमध्ये आरटीईअंतर्गत प्रवेश देऊन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले जात आहे. यासाठी शासनाकडून सदर शाळा संस्थांना प्रतिपूर्तीचा निधी उपलब्ध करुन देण्यात येते. मात्र शासनाकडून गेल्या २०१२–१३ ते २०२१–२२ पर्यंतचे प्रलंबित आरटीईची प्रतिपूर्ती शाळांना देण्यात आली नाही. त्यामुळे या शाळांचे नियोजन कोलमडले आहे. जिल्ह्यातील आरटीई फाऊंडेशनतर्फे शासनाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र, शिक्षण विभागाकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने पुढील वर्षीच्या शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश देणार नसल्याचा निर्णय आरटीई फाऊंडेशनने घेतला आहे.



येथील शारदा इंग्रजी शाळेत आयोजित आरटीई फाऊंडेशन इंडियाच्या जिल्हा कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी आरटीई फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष प्रा.आर.डी. कटरे होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा सचिव सुनील आवळे, उपाध्यक्ष योगीता बिसेन, सहसचिव खलील खान पठाण, वाय.टी. कटरे, जिल्हा मार्गदर्शकश डॉ.नीरज कटकवार उपस्थित होते. यावेळी संस्था चालकांनी आपल्या समस्या मांडल्या. तसेच सभेत खासगी कायम विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्य शाळेची वंचित व दुर्बल घटकातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची शिल्लक असलेल्या शैक्षणिक शुल्कावर चर्चा करण्यात आली. सोबतच जुन्या शाळेतून टीसी न घेऊन जाता दुसऱ्या शाळेत कसा प्रवेश दिला जातो, यावर कसा मार्ग काढता येईल यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे शिक्षणाधिकाऱ्यांनी पालकांकरिता टीसी काढण्याची एक ठराविक कालावधी निश्चित करुन द्यावी व जुन्या शाळेची शिल्लक असलेले शुल्क जमा केल्यानंतर पालकांना टीसी देण्यासंदर्भात बैठकीत विचार करण्यात आला.

खासगी शाळांच्या समस्या व समस्यांचे निराकरण आरटीई फाऊंडेशनच्या वतीने करण्यात येत आहे. शासनाने विशेषतः शिक्षण विभागाने खासगी शाळा संचालकांचा खेळ मांडल्याचे चित्र असून हा खेळ ताबडतोब बंद करुन आरटीईची कोट्यावधीची थांबवून ठेवलेली प्रतिपूर्ती शाळांना देणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील २०२३–२४ या शैक्षणिक सत्रात आरटीई अंतर्गत प्रवेश घेतले जाणार नसल्याचा निर्णय फाऊंडेशनने घेतला असल्याचे आरटीई फाऊंडेशनडे इंडियाचे जिल्हाध्यक्ष प्रा.आर.डी. कटरे यांनी सांगितले.

# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नक्षलभत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता लागू करण्याचे आदेश निर्गमित

**गोंदिया:–** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने मागील दहा वर्षापासून या जिल्ह्यातील १०० टक्के कर्मचाऱ्यांना नक्षलभत्ता पंधराशे रुपये कमाल मर्यादित व अतिरिक्त घरभाडे भत्ता लागू करावा यासाठी संघर्ष सुरू होता. अनेक निवेदने, धरणे आंदोलने, मंत्रालयीन सभा आयोजित करुन मागणी मान्य करण्याची विनंती शासन प्रशासनाला केली होती. या संघर्षाला आज यश मिळाले असून आज ३ ऑक्टोंबर रोजी जिल्ह्यातील सर्वच कर्मचाऱ्यांना सरसकट १५०० नक्षलभत्ता व सरसकट अतिरिक्त घरभाडे भत्ता लागू करण्याचे आदेश निर्गमित झाले आहे. यामुळे सर्वांना थकबाकी निघण्याच्या प्रश्न ही निकाली निघाला आहे.

विशेष म्हणजे न्यायालयीन याचिकेच्या माध्यमातून ५७७ शिक्षक बांधवांना नक्षल भत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता लागू करण्यात शिक्षक समिती यशस्वी ठरली. परंतु या जिल्ह्यातील १०० टक्के शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्यायालयात न जाता सरसकट लाभ मिळावा यासाठी शिक्षक समितीने संपूर्ण जिल्ह्यात सभा घेऊन विशेष मोहीम राबविली होती.

जिल्ह्यातील जवळपास चार हजार वैयक्तिक अर्ज शिक्षक समितीकडे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवांनी सादर केलेत. जि.प. अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना निवेदन देऊन विशेष शिष्टमंडळ सभेचे आयोजन करण्यास लावले. यात शिक्षक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जोरकसपणे दोन्ही लाभ सरसकट लागू करण्याची मागणी जिल्हा प्रशासनाला केली. यात २२ जून रोजी झालेल्या सभेत शिक्षक समितीला आश्वासन सुद्धा देण्यात आले की सात दिवसात सकारात्मक निर्णय घेतला जाईल. परंतु कुठलीही हालचाल जिल्हा प्रशासनाच्या वतीने झाली नाही. यामुळे समितीने आक्रमक पवित्रा घेत २५ जुलै रोजी एक दिवसीय धरणे आंदोलन व बेमुदत साखळी उपोषणाची हाक शिक्षक समितीच्या वतीने देण्यात आली.




७०० ते ८०० च्या संख्येने शिक्षक व शिक्षकेतर बांधव धरणे आंदोलनास उपस्थित झाले. कर्मचाऱ्यांची आक्रमकता बघता व शिक्षक समितीची भूमिका लक्षात घेता तत्काळ उपमुकाअ यांच्या दालनात सर्व विभाग प्रमुखांची सभा घेण्यात आली. सभेत माहे ऑगस्ट महिन्यात पंधराशे रुपये नक्षल भत्ता व माहे सप्टेंबर महिन्यात अतिरिक्त घरभाडे भत्ता लावण्यात येईल. परंतु परत एकदा आश्वासनाची पूर्ती न केल्यामुळे शिक्षक समितीने आरपारची भूमिका जिल्हा प्रशासनाविरोधात घेण्याचे ठरवले.

शिक्षक समितीच्यावतीने १५ सप्टेंबर पासून बेमुदत साखळी उपोषणाचे पत्र प्रशासनाला देऊन आपली भूमिका स्पष्ट केली. शिक्षक समितीची भूमिका बघता मुकाअ यांनी १४ सप्टेंबर रोजी आपल्या दालनात समितीच्या पदाधिकाऱ्यांसमवेत शिष्टमंडळ सभा आयोजित केली व मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. परंतु सभेत ठोस निर्णय न लागल्याने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती आपल्या निर्णयावर ठाम होती व १५ सप्टेंबर रोजी बेमुदत साखळी उपोषणाला संघटनेने सुरुवात केली.

या साखळी उपोषणाची दखल घेत परत एकदा मुकाअ यांनी आपल्या दालनात शिक्षक समितीच्या शिष्टमंडळासह सभा आयोजित केली. सभेत उपमुकाअ व शिक्षण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. यात शिक्षक समितीच्या मागणीला अनुसरुन मुकाअ यांनी मागणी मान्य करीत तत्काळ शिक्षण विभागाला शिष्टमंडळ सभेचा संदर्भ देऊन १५०० रुपये नक्षलभत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता लागू करण्यासंदर्भात आदेशासह नस्ती सादर करण्याचे आदेश दिले.

शिक्षण विभागाने १५ तारखेलाच शिष्टमंडळ सभेचा व उपस्थित शिक्षक समिती पदाधिकाऱ्यांचा संदर्भ देऊन मुकाअ यांच्याकडे नस्ती सादर केली. अवघ्या तीन दिवसात उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, लेखाधिकारी यांनी नस्तीवर तत्काळ कार्यवाही करीत मुकाअ यांच्याकडे १९ सप्टेंबर रोजी मंजुरी करता सादर केली. मुकाअ यांनी शिक्षक समितीच्या शिष्टमंडळाला दिलेल्या वचनाची पूर्तता करीत तत्काळ नस्तीला मंजुरी प्रदान करीत ३ ऑक्टोंबर रोजी जिल्ह्यातील सर्वच कर्मचाऱ्यांना सरसकट १५०० नक्षलभत्ता व सरसकट अतिरिक्त घरभाडे भत्ता लागू करण्याचे आदेश पारित केले.

# घरकुलांपासून विधवा महिला १५ वर्षांपासून वंचित

**सडक अर्जुनी:** तालुक्यातील खोडशिवनी येथील निराधार विधवा महिला सुंगधा शामराव गजबे ही गरजू लाभार्थी असून १५ वर्षांपासून घरकुलाची आस लावून आहे. मात्र अजूनही घरकुल मिळाले नसून घरकुलाच्या योजनेपासून वंचित आहे. सदर विधवा महिलेला घरकुलाचा लाभ मिळावा याकरिता सन २००८ पासून ग्रा.पं. ला मागणी करीत आहे.पण आजपावेतो या महिलेला घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यास ग्रामपंचायतला यश आले नाही. ग्रामपंचायत पदाधिकारी यांना विचारणा केली असता, तुझे नाव घरकुलासाठी पंचायत समितीकडे पाठविले आहे असे सांगून मोकळे होतात.

सदर विधवा महिला आजही जिर्ण झालेल्या पडक्या घरात जीव धोक्यात घालून वास्तव्य करीत आहे. दोन–तीन पिढ्यांपासून असलेले घर रोडाचे उंचीनुसार बसल्याने पावसाळ्यात पाणी घरात साचते. या विधवा महिलेला संजय गांधी निराधार योजना चे



एक हजार रुपये मिळतात. त्यावर ती आपला उदरनिर्वाह चालवत आहे. त्यातच ५ वर्षांपासून घरावर ४–५ हजार रुपयांची ताटपत्री टाकून कशीबशी वेळ काढत आहे. एकीकडे गरजू लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ न मिळता सधन व गरज नाही, अतिक्रमण केलेले व बाहेर गावाहून आलेल्या लोकांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात येतो. मात्र गरजू व पडक्या घरात वास्तव्य करणाऱ्या लोकांना घरकुलाचा लाभ मिळत नाही. आजही सदर विधवा महिला घरकुल मिळेल या आशेवर जीवन जगत आहे. पण या विधवेला घरकुलाचा लाभ केव्हा मिळणार.

विशेष म्हणजे, केंद्र व राज्य शासनाचे धोरणानुसार सन २०१९ ते २०२२ पर्यंत गरजूंना घर व अति आवश्यक लोकांचे प्रपत्र ड यादीत नाव समाविष्ट करुन प्रथम लाभ देण्याचा अधिकार असूनसुद्धा ग्रामपंचायतने वाढीव कुटुंब दाखवून त्यांना लाभ न दिल्याचे विधवा महिलेचे व नागरिकांचे म्हणणे आहे